

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार



ऋषीपंचमी निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा...

▶ संपादक (विकास) : श्याम पेठकर
▶ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७६ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

– आजच संपर्क करा –

८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# दिशा सालियन प्रकरणात अखेर मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल

**वृत्तसंस्था, मुंबई**

बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यूबाबत मोठी बातमी समोर आली आहे. दिशा सालियन प्रकरणात अखेर मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अत्याचार आणि हत्येचा ठपका ठेवत मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सीबीआयने सतिश सालियान यांच्या जबाबावर हा एफआयआर नोंदवल्याची माहिती आहे.दरम्यान, दिशावर अत्याचारकरून हत्या केल्याप्रकरणी तब्बल सहा वर्षांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनोरंजन विश्वापासून अगदी राजकीय वतुर्ळात खळबळ माजवणारे दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यू प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयानं नुकताच निकाल देत या प्रकरणी सीबीआय अधिकारी नियुक्तीचे आदेश दिले होते. तसेच, या प्रकरणी इठर अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेशही मुंबई उच्च न्यायालयानं यावेळी दिले. ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड येथील एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता. दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच १४ जून २०२० रोजी सुशांत सिंह राजपूतचाही मृत्यू झालेला. दरम्यान, दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्यानं चौकशी करण्याची आणि सीबीआयद्वारे तपास करण्याची मागणी केली होती. अशातच या प्रकरणी अखेर सहा वर्षांनी गुन्हा दाखल झाला आहे.





दिशा सालियनच्या गूढ मृत्यूचे प्रकरण अतिशय गाजलेले आणि वादग्रस्त आहे. २०२२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. शिवसेनेचे (शिंदे गटाचे) आमदार भरत गोगावले आणि भाजप आमदार नितेश राणे यांनी दिशा सालियनच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला आणि चौकशीची मागणी केली. या मुद्द्यावरून सभागृहात आमदारांमध्ये बराच गोंधळ झाला होता. या प्रकरणात, नितेश राणे यांनी आदित्य ठाकरेंची नार्को टेस्ट करण्याची मागणीही केली होती. दिशा सॅलियन एक सेलिब्रिटी मॅनेजर होती. तिने वरुण शर्मा, सुशांत सिंग राजपूत, भारती सिंग सारख्या अनेक प्रसिद्ध कलाकारांसोबत काम केले. दरम्यान, दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता.

त्यानंतर तीन दिवसांनी तिचे पोस्टमॉर्टम झाल्याची नोंद आहे. त्यामध्ये दिशाच्या शरीरावर हाताला, पायाला, छातीवरही जखमा झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. दिशाच्या डोक्यावर गंभीर जखम झाल्यामुळेच तिचा मृत्यू झाल्याचं या रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. तसेच दिशाच्या नाकातून आणि तोंडातून देखील रक्त येत होतं, असं देखील रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. मात्र तिच्यावरती कुठलाही लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार झालेला नाही असं रिपोर्टमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे.

## थोडक्यात

### २३ ते २५ सप्टेंबर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर बंद

**पंढरपूर :** श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) आणि राज्य पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली संवर्धनाचे काम करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर २३ ते २५ सप्टेंबरदरम्यान श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर भाविकांच्या मुखदर्शन व पदस्पर्शदर्शनासाठी पूर्णवेळ बंद राहणार आहे. २६ सप्टेंबरपासून दर्शन पूर्ववत सुरू होईल अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली. २२ सप्टेंबर रोजी दिवसभर दर्शन सुरू राहणार असून रात्री दर्शन बंद झाल्यानंतर संवर्धनाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाणार आहे. मूर्तींचे पावित्र्य आणि सुरक्षितता अबाधित ठेवून तज्ज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम अत्यंत काळजीपूर्वक केले जाणार आहे. मूर्ती संवर्धनाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या ७ ऑगस्ट रोजीच्या अंतिम आदेशाने न्यायालयीन अधिमान्यता मिळाली आहे. यापूर्वी २२ ते २४ जूनदरम्यान संवर्धनाचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, न्यायालयीन स्थगिती तसेच त्यानंतर आषाढी यात्रेमुळे हे काम पुढे ढकलण्यात आले होते. मागील काळात १९८८, २००५, २०१२ आणि २०२० मध्ये मूर्तींचे संवर्धन करण्यात आले होते. यावेळी नियमित देखभालीच्या अनुषंगाने मूर्तींना संरक्षक आवरण देण्यात येणार आहे.

## 'बाप्पाच्या भक्ती रंग, सिंहवाणी वृत्त संग'...



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : दक्षिण नागपुरातील वसंत नगर, मानेवाडा रोड येथे राहणारे प्रशांत भुरे यांनी घरी रायगड किल्ल्याची प्रतिकृती साकारून गणरायाची स्थापना केली. त्यांच्या घरी साकारलेल्या या देखाव्याची परिसरात सर्वत्र चर्चा असून सजावटीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.**

# जरांगे मुंबईला जाणारच

### मोजक्या ताफ्यासह आज रवाना?, चौकटीबाहेरील मागण्या अशक्य : मुख्यमंत्री

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. मुंबई पोलिसांनी त्यांना दोनदा आंदोलनाची परवानगी नाकारली असली तरी जरांगे यांनी मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंतरवालीतून मुंबईच्या दिशेने निघण्याचा निर्धार व्यक्त केला. ते १९ सप्टेंबर रोजी मुंबईत पोहोचतील आणि आझाद मैदानावर उपोषण सुरू करणार आहेत. काहीही झाले तरी आपण सरकारला शरण येणार नाही, अशी त्यांची भूमिका आहे.

दरम्यान, मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनास परवानगी नाकारली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जरांगे पाटलांच्या सर्व मागण्या मान्य केल्याचे म्हटले. संविधानाच्या चौकटीबाहेरील मागण्या शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आता मंत्री शंभूराज देसाई यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी आपण लवकरच त्यांची भेट घेणार असून त्यांचे गैरसमज दूर करणार असल्याचे म्हटले.



मनोज जरांगे पाटील ज्या काही गोष्टी बोलतात, त्या पूर्ण सत्य नसून अर्धसत्य आहेत आणि त्यामागे काही गैरसमजही आहेत, असे देसाई यांनी म्हटले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी जरांगे पाटलांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सरकारच्या सर्व प्रक्रियेत सध्या प्रामाणिकपणे सुरू आहेत. सातारा गॅझेट आणि ५८ लाख कुणबी नोंदी यांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर सरकार नियमानुसार आणि गांभीयार्ने कायदेशीर पावले उचलत आहे, अशी माहिती मंत्री देसाई यांनी दिली. तसेच लवकरच प्रत्यक्ष भेट घेऊन मनोज जरांगे यांच्या मनातील सर्व गैरसमज दूर केले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदा परवानगी नाकारली असली तरी आपण एकट्याने उपोषणाला जाणार असल्याचे मनोज जरांगे यांनी जाहीर केले. आपल्यासोबत इतर कुणीही मुंबईला जाणार नसून एकट्याने उपोषण करणार असल्याचे त्यांनी म्हटले. मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदाही कायदेशीर आणि सुरक्षेची कारणे देत उपोषण नाकारल्यामुळे जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम राहून मुंबई गाठणार की उच्च न्यायालयात दाद मागणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**एकट्याने आंदोलनासाठी मागितली परवानगी**

राज्य सरकारने गणेशोत्सवाचे कारण देत आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करत जरांगे यांना परवानगी नाकारली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरांगेंना आंदोलनाचा फेरविचार करण्याची विनंती केली. जरांगे यांनी मात्र, आझाद मैदानावर एकट्याने आंदोलनाची परवानगी मिळावी, यासाठी पुन्हा अर्ज केल्याची माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली.

**सरकारने योग्य मार्ग काढला पाहिजे : सुळे**

जरांगे पाटील आंदोलन करत आहेत, ओबीसी आंदोलन करत आहेत, एमपीएससी विद्यार्थी रस्त्यावर आहेत, आदिवासी मुले रस्त्यावर आहेत, प्रत्येक जिल्ह्यात कुठले ना कुठले आंदोलन या राज्यात सुरू आहे. सरकारने प्रत्येकाशी चर्चा करून मार्ग काढला पाहिजे, असेही सुळे यांनी म्हटले.

# उमरेड-भिवापूर रोडवर भरधाव स्वराज ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक, बहीण-भावावर काळाचा घाला

### दुचाकीस्वार भावाचा जागीच मृत्यू, १६ वर्षीय बहीण गंभीर जखमी, नागपुरात उपचार सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेडमध्ये सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास काळजाचा थरकाप उडवणारी भीषण घटना घडली. भिवापूर नाका परिसरात क्लासला जाणाऱ्या बहीण-भावाच्या दुचाकीला भरधाव स्वराज ट्रॅव्हल्सने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार वेदांशू नरेंद्र व्हराडे वय १८ याचा जागीच मृत्यू झाला. तर त्याची १६ वर्षीय बहीण प्रिन्सि नरेंद्र व्हराडे गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वेदांशू आणि प्रिन्सि हे सख्खे बहीण-भाऊ असून सकाळी शिवापूर येथून उमरेडकडे क्लाससाठी दुचाकीने येत होते. त्याचवेळी स्वराज ट्रॅव्हल्स क्रमांक एम एच ४० ए टी ०३५८ ही भरधाव वेगाने भिवापूरच्या दिशेने जात असताना भिवापूर नाका परिसरात त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. धडक इतकी भीषण होती की वेदांशूचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर प्रिन्सि गंभीर जखमी झाली. अपघाताची माहिती मिळताच उमरेड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

**खड्डे, अरुंद रस्ता आणि भरधाव वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर**

या भीषण अपघातानंतर उमरेड-भिवापूर मार्गावरील रस्त्याची दुरवस्था आणि भरधाव वाहनांच्या वेगाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या मार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून दुचाकी तसेच चारचाकी वाहनचालकांना खड्डे चुकविताना कसरत करावी लागते. अशावेळी मागून येणाऱ्या भरधाव वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

उमरेड ते भिवापूर हा मार्ग अनेक ठिकाणी अरुंद असून या मार्गावर मोठ्या प्रमाणात रेती वाहतूक देखील सुरू असते. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढली असून भरधाव प्रवासी वाहने आणि अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत, रस्त्याची दुरुस्ती करावी आणि भरधाव वाहनांच्या वेगावर आळा घालण्यासाठी प्रशासन व पोलिसांनी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या भीषण अपघातामुळे शिवापूर मामाचे गाव तसेच मल्हारपूर परिसरात हळहळ व्यक्त होत असून एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# ढोल, ताशाच्या गजरात लाडक्या गणरायाचे आगमन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बच्चेकंपनीसह सर्वांच्या लाडक्या गणरायाचे सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी ढोल-ताशाच्या गजरात आगमन झाले. शहरासह जिल्ह्यातील सर्वच तालुक्याच्या ठिकाणी व ग्रामीण भागात घरोघरी पारंपरिक पध्दतीने विधीवत पूजन करून श्री गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. सार्वजनिक गणेश मंडळानी ढोल- ताशाच्या गजरात मिरवणूक काढत श्री गणेशाची स्थापना केली. गणरायाच्या आगमनामुळे बाजारपेठेत नागरीकांची पुजेचे साहित्य, मिठाई, फळे खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी पहावयास मिळाली. यामुळे बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.

शहरासह जिल्हाभरात लाडक्या गणरायाचे सोमवारी घरोघरी उत्साहात आगमन झाले.



लाडक्या गणरायाचे घरात आगमन होताच बच्चेकंपनीसह वयोवृध्द व घरातील मंडळीनी गणपती बप्पा मोरया, मंगलमुर्ती मोरयाचा जयघोष केला. त्यानंतर घरोघरी पारंपारिक विधीवत पध्दतीने श्री गणेशाची प्रतिष्ठापना करून आरती करण्यात आली. सार्वजनिक गणेश मंडळानी मंदिर देखाव्याच्या प्रतिकृतीचे पेंडाल उभारले असून संपूर्ण गणेशोत्सव दरम्यान विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दररोज आरतीला कोणत्या मान्यवरांना बोलवायचे याचे नियोजन तयार करण्यात आले आहे.

घरोघरी महिला मंडळीनी लाडक्या गणरायाच्या आवडीचे मोदक, वळीव लाडू, करंज्या असे पदार्थ आदी पासूनच तयार केले होते. गणेशोत्सवाच्या काळात दररोज कोणता नैवेद्य दाखवायचा याचे देखील नियोजन प्रत्येक कुटंबाने आखून ठेवले आहे. त्यामुळे दररोज आरती होताच विविध खाद्य पदार्थ खायला मिळणार असल्याने बच्चे कंपनीसह वयोवृध्द, महिला मंडळी व कुटुंबियांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळत आहे. विशेषतः बाजारपेठेत स्वीट मार्टच्या दुकानांमधून अनेक प्रकारचे मोदक उपलब्ध करून देण्यात आले होते. नोकरदार गृहिणींनी रेडीमेड मोदक खरेदीसाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळाले. परभणी शहरातील बाजारपेठेत फुलांचे हार, रेडीमेड फुलांचे हार तसेच शोभेच्या वस्तू विक्रीसाठी दाखल झाल्या असून डेकोरेशनचे हे साहित्य खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर बाजारपेठेत मोठी गर्दी झाली होती. विविध आकारातील गणेशमुर्ती घेण्यासाठी बच्चेकंपनीसह जेष्ठ नागरिक सहकुटुंबीय बाजारपेठेत आल्याचे पहावयास मिळाले.

संपादकीय लेखणीतून...

## मराठवाडा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची मोठी घोषणा

मराठवाडा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला जालना येथे केली असली तरी प्रत्यक्षात आज मराठवाड्यात दुष्काळ 'आ' वासून उभा आहे. कोल्हापूर आणि सांगली परिसरातील पुराचे अतिरिक्त पाणी उजनी धरणात आणून त्यातील ३५ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्याचे काम सुरू आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले होते. यासोबतच पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्राकडे वाहून जाणारे सुमारे ८० टीएमसी पाणी कोकणातून थेट मराठवाड्यात आणि गोदावरी खो-यात वळविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही फडणवीस म्हणाले होते. परंतु भविष्याच्या गप्पा मारण्यापेक्षा वर्तमानात काय वाढून ठेवले आहे ते बघितले पाहिजे. मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विभागीय महसूल उपायुक्तांकडे करण्यात आली आहे.मराठवाड्यातील सर्व छोट्या-मोठ्या प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात यावे अशी मागणीही करण्यात आली आहे. मराठवाड्यातील चित्र अत्यंत गंभीर असून पावसाळ्याचे तीन महिने उलटूनही या भागातील एकाही जिल्ह्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. जो थोडाफार पाऊस झाला होता त्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरणी केली. परंतु गत दीड-दोन महिने कोरडे गेल्याने शेतकऱ्यांनी पेरलेली पिके धोक्यात आली असून खरीप हंगामातील पिके वाळून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिकदृष्ट्या मोठ्या संकटात आहे. सप्टेंबर महिन्यातही पाऊस कमी पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून त्यांना मदत द्यावी. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील शेतमजूर, भूमिहीन कुटुंबांना रोजगाराची व्यवस्था रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावी अशी मागणी होत आहे, मराठवाड्यातील सर्व तलावांतील पाणीसाठा हा भविष्यातील पाणीटंचाईच्या अनुषंगाने आरक्षित करणे आवश्यक आहे.

शासनाने दुष्काळी परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना तात्काळ मदत करणे गरजेचे आहे. राज्यात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.अनेक भागात उभी पिके पाण्याअभावी करपू लागली आहेत. गत तीन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, बाजरी, कपाशी, तूर, मूग, उडीद आणि ऊस पिकांवर संकट आले आहे. ऐन मोक्याच्या क्षणी पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेली परिस्थिती थेट पीक उत्पादकतेवर गदा आणणारी ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते आणि माजी आमदार धिरज देशमुख यांनी लातूरसह संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रातील दुष्काळसदृश भागामध्ये कृत्रिम पाऊस (क्लाऊड सिडिंग) पाडण्याची मागणी सरकारकडे केली आहे. पावसाने डोळे वटारल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. अशा वेळी केवळ पावसाची वाट पाहत बसण्यापेक्षा सरकारने उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पर्यायांचा तातडीने वापर करण्याची गरज आहे. हे तंत्रज्ञान हमखास पाऊस पाडेल, असा दावा नाही, मात्र योग्य हवामान आणि ढगांची परिस्थिती उपलब्ध असेल, तर हा पर्याय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नक्कीच तपासून पाहिला पाहिजे. शेतकरी संकटात असताना सरकारकडे उपलब्ध असलेला प्रत्येक वैज्ञानिक पर्याय वापरला गेला पाहिजे, असे धिरज देशमुख यांनी म्हटले आहे.

कृत्रिम पावसाच्या प्रयोगामुळे शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळू शकतो. यंदाच्या मान्सून हंगामाने शेतकऱ्यांची कठोर परीक्षा घेतली आहे. ऑगस्ट महिन्यात काही भागात चांगला पाऊस झाला असला तरी देशातील एकूण पावसाची तूट १४ टक्क्यांवर पोहोचली आहे. असमान आणि अनियमित पावसामुळे खरीप पिकांच्या पेरणीवर परिणाम झाला आहे. भाताच्या क्षेत्रात ३ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे तर मक्याच्या क्षेत्रात ४ टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे. देशातील १२ राज्यांमध्ये पावसाची तूट २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. बिहार, आंध्र प्रदेश, मेघालय, मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशामध्ये ही तूट ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

# गोंगाटाचा गळा आवळा लेझरचे दिवे विझवा

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

सार्वजनिक उत्सव आणि गोंगाट यांचं नातं तसं जुनंच आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठा असलेला गणेशोत्सव गेली शंभर वर्षे या गोंगाटासह सुरू आहे. कारण, आता आतापर्यंत हा गोंगाट १०-१२ दिवसांसाठी सुद्धा सुसह्य असायचा. एरवीपेक्षा थोडा जास्त आवाज होत असे हे खरंच. पण तो कानठळ्या बसण्याइतकाही मोठा नसायचा. आपली परंपरागत वाद्ये आणि लाऊडस्पीकर यांचाच काय तो आवाज. ऑर्केस्ट्रा संगीतमय असल्यानं सुमधुर वाटायचा. विसर्जनाच्या दिवशीच मोठा गोंगाट. पण तोही आजच्या डीजेपेक्षा कमीच असायचा.

काळ बदलला. डीजे आला. आवाजावर जणू नियंत्रणच राहिलं नाही. इंग्रजी नाव असलेला धांगडधिंगा. त्यात भर पडली लेझर शोची. कानठळ्या बसवणारा डीजे आणि डोळे दीपवणारे लेझर. यांच्या अनिर्बंध वापराचा परिसरातील लोकांना त्रास होऊ शकतो, हे लक्षात घ्यायला उत्साही लोक तयारच नाही. डेसिबलचा नियम काढला तो पाळणार नाही, रात्री १० नंतर वाजवू नका हा आदेश हमखास मोडणार. कोणी थांबवण्याचा प्रयत्न केला तर भांडण, मारामाऱ्या करणार. यातून आजचा जनाक्रोश भडकला आहे, हे सर्वांनी लक्षात घेतलं पाहिजे.

घरोघरी वृद्ध लोक, आजारी माणसं, छोटी मुलं असतातच. त्यांना भलत्याच वेळी होर्णाऱ्या या गोंगाटाचा त्रास होऊन तब्येती बिघडू शकतात. विशेषतः कानाचे विकार बळावल्याच्या तक्रारी झाल्याही आहेत. काही ज्येष्ठ नागरिक तर बळी पडण्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या. हे गंभीर प्रकार लक्षात घेऊनच डीजेबंदीची, लेझरबंदीची मागणी पुढे आली. त्याला हळूहळू प्रतिसादही वाढत गेला. शेवटी काही शहरांमध्ये पोलिसांनी डीजे, लेझर यावर बंदीच घातली. तरीही न जुमानता 'आवाज वाढव', 'लेझर चालव' च्या घटना घडल्या आणि गुन्हे नोंदवावे लागले. हे योग्य झालेलं नाही.

लोकांच्या स्वास्थ्यक्षणाच्या दृष्टीनं ४०-५० डेसिबल पर्यंतचा डीजेचा आवाज ठीक वाटतो. त्यापेक्षा जास्त आवाज त्रासदायकच असतो. मुख्य म्हणजे, अशा आवाजाची कमाल मयार्दा कायद्यानं घालून दिलेली आहे. त्यासाठी प्रत्येक वस्तीच्या परिसराचे चार गट पाडण्यात आले आहेत.

एक : रुग्णालय, शिक्षण संस्था, न्यायालय आदींच्या शांतता क्षेत्रात १०० मीटरपर्यंत बंदी. त्याबाहेर दिवसा ५० आणि रात्री ४० डेसिबल

दोन : घरे असलेल्या निवासी भागात दिवसा ५५ आणि रात्री ४५

तीन : व्यापारादी उलाढाली करणाऱ्या व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५ आणि रात्री ५५

चार : उत्पादन होणाऱ्या औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ आणि रात्री ७० डेसिबल

वेळांचे बंधन : वरील नियम पाळून रात्री १० वाजेपर्यंतच परवानगी. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत पूर्ण बंदी. रात्री १२ वाजेपर्यंत अपवादात्मक परवानगी वर्षभरात १५ दिवस.

ही बंधनं पाळली जाताना दिसतात का? या सर्व कायद्यांना न जुमानता रात्री १० नंतर डीजे वाजवून आवाज १०० डेसिबलच्याही वर नेल्याचा एक प्रकार नुकताच नागपुरात घडला! म्हणजे, एकाच घटनेत ३ गुन्हे. दुप्पट डेसिबलच्या आवाजानं काही काळ लोकांच्या किती कानठळ्या बसल्या असतील, सांगता येत नाही. यातून ज्या समस्या उद्भवल्या आणि काहींना जे काही भोगावं लागलं, याला जबाबदार कोण? त्यांना भरपाई कोण देणार?

हे सर्व नियम आजचे नाहीत. राष्ट्रीय हरित लवादानं अभ्यास करून तयार केलेले आहेत. सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट यांनी त्याआधारे वेळोवेळी निकालही दिले. तरी प्रश्न सुटत नाही. याचं कारण, काही जणांचा अट्टहास, बेपर्वाई, मगरूरी. स्वतःच्या आनंदासाठी दुसरे कोणी दुःखी होऊ नये, याची तमा न बाळगण्याची वृत्ती. ती बदलणं गरजेचं आहे. आपल्या सर्वांनाच शांततेत जगण्याचा समान मूलभूत अधिकार आहे, हे सर्वांनी मान्य केलं तरच वृत्तीत फरक पडेल आणि तरच या समस्या सुटतील.

अन्यथा, आवाज करणाऱ्यांना आसुरी आनंद अन् तो आवाज सहन करणाऱ्यांना मात्र दुःख असा परस्परविरोधी परिणाम होईलच. आपल्याकडील ढोलताशांच्या तुलनेत डीजे हा फार जास्त त्रासदायक आहे. त्याचा रांगडेपणा आपल्या परंपरागत तालभानाशी जुळत नाही. लेझरचे लाईटही फार तीव्र असतात. या दोन्ही प्रकारांना कायम बंदी घालणे आता आवश्यक होऊन बसले आहे. सण, परंपरा, भावना वगैरेंच्या नावाखाली डीजे-लेझरचं समर्थन करणाऱ्यांनी कृपया यातील धोक्यांचा शांत डोक्यानं विचार करावा . आज जे दुसऱ्याला भोगावं लागत आहे, तेच उद्या तुमच्याही घरातील कोणाच्या नशिबी येणार नाही, याची कुठलीही हमी नाही मित्रांनो.

भविष्यातील हे वाढत जाणारं संकट टाळायचं असेल तर उपाय दोनच- डीजे, लेझर सारख्या राक्षस कुळातील यंत्रांना झुगारून देणं आणि आपल्या मूळ वाद्यांचाही मर्यादित आवाजातच वापर करणं. कान-डोळे (अन् प्रसंगी प्राण सुद्धा) वाचवण्यासाठी ते उघडे ठेवून विचार करा राजेहो.

# विश्ववंद्य विघ्नहर्ता : भूमंडळी लाभले रूप तुझे

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

विश्ववंद्य विघ्नहर्ता आणि भूमंडळी लाभले रूप तुझे या ओळी लाडक्या गणपती बाप्पाच्या (श्री गणेश) महिमा आणि रूपाचे अत्यंत सुंदर वर्णन करणारे आहे. गणपती उत्सव केवळ भारतातच साजरा केला जातो,असे नसून भारतासह जागतिक स्तरावर हा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.भारताबाहेर स्थायिक झालेल्या हिंदू आणि मराठी बांधवांनी आपली संस्कृती परदेशातही जिवंत ठेवली आहे. आज केवळ आशियाई देशच नव्हे, तर युरोप आणि अमेरिकेतही बाप्पाच्या नावाचा जयघोष ऐकू येतो.

लोकमान्य बाळ गंगाधार टिळकांनी ब्रिटीश राजवटीविरुद्ध सामाजिक एकतेसाठी सुरू केलेला हा उत्सव आज जगाच्या कानाकोपऱ्यात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. अनिवासी भारतीयांच्या वाढत्या संख्येमुळे आणि संस्कृतीच्या प्रसारामुळे अमेरिका, युरोप आणि आशियातील अनेक देशांमध्ये ढोल-ताशांचा गजर ऐकू येतो.

भारताबाहेर मॉरिशसमध्ये गणेशोत्सव अतिशय मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. येथे गणेश चतुर्थीच्या दिवशी शासकीय सुट्टी असते. स्थानिक हिंदू बांधव नद्या आणि समुद्राच्या काठावर एकत्र येऊन ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाचे विसर्जन करतात. नेपाळमध्ये या सणाला 'चाथम पर्बा' म्हटले जाते. काठमांडूसह संपूर्ण देशात गणपतीच्या मूर्तींची स्थापना करून विशेष पूजा केली जाते.

आशियातील अनेक देशांमध्ये गणपतीला स्थानिक नावांनी आणि हिंदू-बौद्ध संस्कृतीच्या मिलाफातून पूजले जाते. थायलंडमध्ये गणपतीला 'फ्रा फिकानेत' म्हणून ओळखले जाते. तेथे केवळ हिंदूच नाही, तर बौद्ध धर्मीय नागरिकही



कला आणि यशाची देवता म्हणून बाप्पाची पूजा करतात. बँकॉकमध्ये गणेश चतुर्थीला मोठे उत्सव होतात. जपानमध्ये गणपतीचे 'कांगितेन' असे रूप पूजले जाते, जे सुख आणि यशाचे प्रतीक मानले जाते. तेथील 'मात्सुचियामा शोदेन' या प्रसिद्ध मंदिरात बाप्पाला मोदकांऐवजी मुळा अर्पण करण्याची अनोखी परंपरा आहे. इंडोनेशिया विशेषतः बाली बेटावर गणपतीची मोठी मंदिरे आहेत आणि कला-विद्येची देवता म्हणून बाप्पाची दैनंदिन पूजा केली जाते.

पाश्चात्त्य देशांमधील आधुनिक आणि भव्य गणेशोत्सव अमेरिका, युरोप आणि ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांनी (विशेषतः महाराष्ट्रीयन मंडळांनी) तेथे 'मुंबई-पुण्यासारखा' माहोल तयार केला आहे अमेरिका न्यू जर्सी, कॅलिफोर्निया, टेक्सास आणि न्यूयॉर्कमधील मंदिरांमध्ये तसेच कम्युनिटी सेंटर्समध्ये भव्य मूर्तींची स्थापना केली जाते. ढोल-ताशांची पथके, मराठी खाद्यपदार्थ (मोदक) आणि कृत्रिम तलावांमध्ये केले जाणारे विसर्जन हे येथील मुख्य आकर्षण असते.

युनायटेड किंगडम लंडन, लेस्टर आणि बर्मिंगहॅम या शहरांमध्ये मोठ्या मिरवणुका निघतात. लंडनमधील 'हिंदू कल्चर अँड हेरिटेज सोसायटी' आणि स्थानिक मंडळे नदीकाठच्या परिसरात विसर्जन सोहळे आयोजित करतात. फ्रान्स पॅरिसमधील प्रसिद्ध 'श्री मणिका विनायकर आल्यम' मंदिरातून निघणारी रथयात्रा संपूर्ण फ्रान्समध्ये प्रसिद्ध आहे, ज्यामध्ये हजारो परदेशी नागरिकही सहभागी होतात. ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा मेलबर्न, सिडनी आणि टोरंटो सारख्या शहरांमध्ये स्थानिक नियमांचे पालन करून इको-फ्रेंडली (शाडूच्या) मूर्तींचे घरगुती व सार्वजनिक उत्सव साजरे केले जातात. दुबई आणि अबू धाबीमध्ये राहणारा भारतीय समुदाय आता अधिकृत परवानग्या घेऊन मोठ्या हॉलमध्ये किंवा मंदिरांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांसह भव्य गणेशोत्सव साजरा करतात.

महाराष्ट्राच्या या लाडक्या गणेशोत्सवाला 'युनेस्को' च्या जागतिक सांस्कृतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठीही विशेष प्रयत्न सुरू आहेत, ज्यामुळे या उत्सवाची जागतिक ओळख अधिक गडद होत आहे.

- ९५६१५९४३०६

# सुपर संडे ठरला भारतीय क्रिकेट साठी गोल्डन डे!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारत आठव्यांदा महिला आशिया कप चॅम्पियन बनला. दुबईमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात श्रीलंकेला ७२ धावांनी हरवून संघाने विजेतेपद पटकावले. टीम इंडियाने स्पर्धेत सर्वाधिक ३२ षटकार मारले. या सामन्यात स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांनी स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी भागीदारी केली. मात्र, पारितोषिक वितरण समारंभात टीम इंडियाने आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला.

### भारत विरुद्ध श्रीलंका सामन्यातील महत्त्वाचे क्षण आणि विक्रम

१. भारताने मोहसिन नक्वी यांच्याकडून चषक स्वीकारण्यास नकार दिला

भारताने मोहसिन नक्वी यांच्याकडून चषक आणि पदके स्वीकारण्यास नकार दिला. पदक वितरण समारंभादरम्यान नक्वी मंचावर पोहोचले होते. त्यांनी श्रीलंकन संघाला पदके प्रदान केली आणि कर्णधार चमारी अटापट्टूला उपविजेतेपदाचा धनादेशही दिला. नंतर हे पदक वितरण रद्द करण्यात आले. भारतीय संघ चषक आणि पदकांशिवाय ड्रेसिंग रूममध्ये परतला.

२. दुखापतीनंतर श्रीलंकन क्षेत्ररक्षकाला स्ट्रेचरवरून बाहेर नेले

भारतीय डावाच्या पाचव्या षटकात गोलंदाजी करताना श्रीलंकन क्षेत्ररक्षक विश्मी गुणरत्नेच्या उजव्या घोट्याला गंभीर दुखापत झाली. ती वेदनेने विव्हळत जमिनीवर कोसळली. फिजिओथेरपिस्टला बोलावण्यात आले. तपासणीनंतर तिला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. या काळात खेळ थांबवण्यात आला होता. तथापि, ती दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी परतली आणि तिने २० धावा केल्या.

३. एक धाव घेण्याच्या प्रयत्नात स्मृती धावबाद झाली

१४ व्या षटकात, एक धाव घेण्याच्या प्रयत्नात स्मृती धावबाद झाली. स्मृती आणि हरमनप्रीत कौर दोघींनीही कट शॉट मारण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी, कविशा दिलहरीने पॉइंटवरून चेंडू फेकला आणि यष्टीरक्षकाने यष्टी उडवल्या. स्मृतीने तिच्या ५९ धावांच्या खेळीत ५ चौकार आणि ३ षटकार मारले.

### प्रमुख विक्रम

१. आशिया कप २०२६ मध्ये भारताने सर्वाधिक षटकार मारले

या महिला टी२० आशिया कपमध्ये भारताने ३२ षटकारांसह सर्वाधिक षटकार मारले. श्रीलंका ८ षटकारांसह दुसऱ्या स्थानावर राहिली.

२. स्मृती आणि शेफाली यांनी आशिया कपमधील सर्वोच्च भागीदारी केली

स्मृती आणि शेफाली यांनी पहिल्या विकेटसाठी १२९ धावा जोडल्या. महिला टी२० आशिया कपमधील कोणत्याही विकेटसाठी ही सर्वोच्च भागीदारी आहे.

३. स्मृती आणि शेफाली यांची सहावी शतकी भागीदारी

स्मृती आणि शेफाली यांनी महिला टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वाधिक शतकी भागीदारीच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. ही त्यांची सहावी शतकी भागीदारी असून, त्यांनी युएईच्या ईशा ओझा आणि तीर्था सतीश यांनी प्रस्थापित केलेल्या विक्रमाची बरोबरी केली आहे.

४. शेफाली यांनी महिला टी२० आशिया कपमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावले

शेफाली वर्माने २४ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून, या स्पर्धेत सर्वात जलद अर्धशतक करणारी फलंदाज बनण्याचा मान मिळवला.

५. शेफालीच्या यावर्षी ६७५ धावा

शेफालीने २०२६ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ६७५ धावा केल्या आहेत, ज्यामुळे ती एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक धावा करणारी दुसरी भारतीय खेळाडू ठरली आहे. स्मृती मंधाना २०२४ मध्ये ७६३ धावा करून पहिल्या स्थानावर आहे.

६. श्री चरणी एका वर्षात भारताची सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज ठरली

श्री चरणी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एका कॅलेंडर वर्षात भारताची सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज ठरली आहे. अंतिम सामन्यातील चार बळींसह, तिने यावर्षी ३९ बळी घेत पूनम यादवच्या ३५ बळींचा विक्रम मागे टाकला आहे.

७. आशिया कप टी२० अंतिम सामन्यात चार बळी घेणारी श्री चरणी तिसरी गोलंदाज ठरली

श्री चरणीने अंतिम सामन्यात २० धावांत चार बळी घेत, महिला टी-२० आशिया कपच्या अंतिम सामन्यात चार बळी घेणारी तिसरी गोलंदाज होण्याचा मान मिळवला.

दिल्ली येथे रविवारी झालेल्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अफगाणिस्तानवर सात गडी राखून सहज विजय मिळवत भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. अभिषेक शर्माच्या (८२ धावा) झंझटक्या अर्धशतकाला आणि अर्शदीप सिंगच्या अचूक गोलंदाजीला याचे श्रेय जाते. अभिषेकने आपल्या ३२ चेंडूंच्या आक्रमक खेळीत सात षटकार आणि तेवढेच चौकार ठोकले. त्याने इशान किशनसोबत (४२ धावा, पाच चौकार, एक षटकार) दुसऱ्या विकेटसाठी ५३ चेंडूंमध्ये १२१ धावांची शतकी भागीदारी केली, ज्यामुळे भारताला अवघ्या १३.४ षटकांत तीन गडी गमावून १५७ धावांचे लक्ष्य गाठता आले. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलेल्या अफगाणिस्तानने अर्शदीपच्या गोलंदाजीतील विविधतेच्या जोरावर आठ गडी गमावून १५६ धावा केल्या होत्या.

भारताने आपली एकमेव विकेट तिसऱ्या षटकात अझमतुल्ला उमरझाईच्या गोलंदाजीवर संजू सॅमसनच्या (१० धावा) रूपाने गमावली. उमरझाईच्या चांगल्या लांबीच्या चेंडूवर सॅमसनने फटका मारण्याचा प्रयत्न केला आणि डीप स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या दरविश रसूलीने त्याचा झेल घेतला. फिरोजशाह कोटलाच्या सपाट खेळपट्टीवर फलंदाजी करणे फारसे आव्हानात्मक नव्हते.

अभिषेकने अफगाण गोलंदाजांविरुद्ध सहज खेळ केला, याची सुरुवात त्याने पहिल्याच षटकात फजलहक फारुकीच्या ओव्हरपिच चेंडूवर डीप एक्स्ट्रा कव्हरवरून षटकार मारून केली. सॅमसन बाद झाल्यानंतर, अभिषेकने उमरझाईच्या गोलंदाजीवर चेंडू थेट प्रेक्षकांमध्ये पाठवून आपल्या डावातील दुसरा षटकार ठोकला. त्यानंतर अभिषेकने फारुकीच्या गोलंदाजीवर मिडविकेटवरून आपल्या डावातील तिसरा षटकार मारून अवघ्या २२ चेंडूंमध्ये आपले १२ वे टी२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक पूर्ण केले. दुसऱ्या टोकाला उभ्या असलेल्या इशाननेही प्रेरणा घेऊन फारुकीच्या गोलंदाजीवर षटकार मारला. अफगाण फिरकी गोलंदाज गोलंदाजीला येईपर्यंत अभिषेकने सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व मिळवले होते. नूर अहमदचा टप्पा आणि दिशा अचूक नव्हती, ज्याचा अभिषेकने पुरेपूर फायदा घेतला. बाद होण्यापूर्वीच त्याने सात षटकार आणि तितकेच चौकार मारले होते. त्याच्या बाद झाल्यानंतर भारताला विजयासाठी केवळ १७ धावांची गरज होती. तत्पूर्वी, अफगाणिस्तानच्या डावात जसप्रीत बुमराहने काही अप्रतिम चेंडू टाकले, पण अर्शदीपने अपवादात्मक गोलंदाजी केली. पहिल्या १० षटकांपर्यंत, वरुण चक्रवर्ती (१/१६) आणि अक्षर पटेल (१/२७) या दोन फिरकी गोलंदाजांनी नियंत्रण राखले. त्यानंतर अझमतुल्ला उमरझाई (४४ चेंडूंत नाबाद ६४ धावा) आणि मोहम्मद नबी (२७ चेंडूंत ३३ धावा) यांनी सहाव्या विकेटसाठी ८३ धावा जोडून अफगाणिस्तानला १५० धावांच्या पुढे नेले. बुमराहने (१/२६) पूर्ण वेगाने गोलंदाजी केली आणि १६ निर्धाव चेंडू टाकले. त्याने कोलकाता नाईट रायडर्सचा माजी स्टार खेळाडू रहमानुल्ला गुरबाज (०) याला अशा चेंडूवर बाद केले, जो फलंदाजाच्या बॅटची कड घेऊन पहिल्या स्लिपमधील अभिषेक शर्माकडे गेला, ज्याने एक अप्रतिम नीचांकी झेल घेतला.

दुसरीकडे, अर्शदीपने आपल्या गोलंदाजीतील वैविध्य आणि वेगाचा फायदा घेत महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. इब्राहिम झद्रान (१३) आणि सेदिकुल्ला अटल (११) यांनी काही चांगले फटके खेळले.मात्र, निष्काळजीपणामुळे अफगाण कर्णधाराला आपली विकेट गमवावी लागली. अर्शदीपने अफगाण फलंदाजांना मोकळेपणाने खेळू दिले नाही. त्याने अटलला एक वाईड यॉर्कर टाकला, पण फ्लाय स्लिपमध्ये उभ्या असलेल्या बुमराहने सोपा झेल घेतला. गुलबदिन नायब (०२) याने अक्षरच्या गोलंदाजीवर एक खराब इनसाइड-आऊट शॉट खेळला आणि नितीश रेड्डीने त्याचा झेल घेतला. त्यानंतर वरुणने आक्रमक गोलंदाजी करत सातत्याने यष्टींवर लक्ष्य साधले आणि दरविश रसूली (०२) याची विकेट घेतली. यामुळे अफगाणिस्तानची धावसंख्या सात षटकांत पाच गडी बाद ४३ झाली.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# आंदोलनाऐवजी एकजुटीने संकल्पपूर्ती करा !

## गणेशोत्सवाचे दहा दिवस महाराष्ट्राला मजबुती देणारे : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर राज्यातील सर्व पक्ष आणि समाजातील नागरिकांनी आंदोलनाऐवजी महाराष्ट्राच्या विकासासाठी एकजुटीने राहावे. गणपती उत्सवाचे हे दहा दिवस महाराष्ट्राला मजबुती देणारे असून, या काळात अनेक संकल्प केले जातात. या संकल्पांची पूर्तता करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत आणि महाराष्ट्र, समाज तसेच कोणत्याही व्यक्तीला गालबोट लागणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. गणेशोत्सवानिमित्त महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला.



गणपती बाप्पा आपल्याला विकसित महाराष्ट्र घडविण्याची बुद्धी देण्यासाठी आले आहेत. आज आनंदाचा दिवस आहे. सर्वत्र हिंदू बांधव गणरायाची पूजा करून प्रतिष्ठापना करीत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. गणरायाच्या चरणी राज्यातील जनतेचे जीवन मंगलमय राहावे, अशी प्रार्थना करतो.

**१८ जिल्ह्यांवर दुष्काळी परिस्थितीचे लक्ष**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, गणपती बाप्पाच्या आगमनाबरोबर काही भागांत पावसाने हजेरी लावली आहे. ज्या भागात अद्याप अपुरा पाऊस झाला आहे, त्या ठिकाणीही पाऊस पडून दुष्काळी परिस्थिती दूर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

१८ जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची आकडेवारी प्रशासनाकडून प्राप्त झाली असून, ही आकडेवारी मंत्रिमंडळासमोर मांडणार आहे. ज्या भागात पाऊस चांगला झाला आहे, तिथे पुन्हा सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रासाठी सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले असून, सध्या १८ जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जात असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**महसूल विभागात १०७ महत्त्वाचे निर्णय**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागात काम करताना आतापर्यंत १०७ कॅबिनेट निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य जनतेची मालमत्ता सुरक्षित राहावी, त्यांचे हक्क अबाधित राहावेत, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उत्तम काम करीत असून, त्यांचा मला अभिमान आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

राज्यात लवकरच 'लँड टायटलिंग अँक्ट' आणण्यात येणार असून, मोजणी केल्याशिवाय रजिस्ट्री होणार नाही. त्याचबरोबर मुख्यमंत्री बळीराजा रस्ते योजनेवरही काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**फ्लॅटधारकांचे नुकसान होऊ देणार नाही**

नागपुरातील काही फ्लॅटच्या रजिस्ट्री रखडल्याबाबत बावनकुळे म्हणाले की, काही बिल्डरांनी ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (ओसी) न घेताच फ्लॅटची विक्री केली आहे. त्यामुळे संबंधित फ्लॅटधारकांची रजिस्ट्री होत नाही. नोंदणी अधिनियमा प्रमाणे रजिस्ट्रीसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होत नसल्याने ही अडचण निर्माण झाली आहे.

मुंबई आणि ठाण्यात अशा अनधिकृत बांधकामांच्या प्रकरणांत मार्ग काढण्यात आला आहे. ज्यांनी अशा ठिकाणी फ्लॅट खरेदी करून आपली संपूर्ण गुंतवणूक पणाला लावली आहे, त्या नागरिकांचा दोष नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी मार्ग काढण्याची गरज आहे. अशा प्रकरणांचे नियमितीकरण करण्याचा सरकारचा विचार आहे. मात्र, यामध्ये गरीब फ्लॅटधारकांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही. सरकार त्यांच्या पाठीशी उभे राहील, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

त्याचवेळी अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बिल्डरांना इशारा देताना ते म्हणाले, कुठल्याही परिस्थितीत अनधिकृत बांधकाम करू नका. जेवढ्या फ्लॅटची परवानगी आहे, तेवढ्याच फ्लॅटची विक्री बिल्डरने केली पाहिजे. अशा प्रकारे गैरप्रकार करणाऱ्या बिल्डरांना सरकार सोडणार नाही.

**कर्नाटकातील दुष्काळावरही अहवाल मागविले**

कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीबाबतही अहवाल मागविण्यात आले असून, जिल्हाधिकारी स्तरावरून अहवाल सादर केले जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ए टू झेड' सर्वेक्षणाचे आदेश दिले होते. त्यानुसार सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

### थोडक्यात

## सुधीर पारवेंच्या निवासस्थानी गणरायाची प्रतिष्ठापना



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
उमरेड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुधीर पारवे यांच्या उमरेड येथील निवासस्थानी अडीच दिवसीय श्री गणेशमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. पारवे यांनी सहपरिवार गणरायाचे पूजन व आरती करून दर्शन घेतले. मतदारसंघातील नागरिकांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी व उत्तम आरोग्य नांदावे तसेच उमरेड विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला बळ मिळावे, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करीत सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरा जपावी, असे आवाहन पारवे यांनी नागरिकांना केले.

## कलाशिक्षक सुरेश राठोड यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील कलाशिक्षक सुरेश बा. राठोड यांना शैक्षणिक, सांस्कृतिक आणि विद्यार्थीहिताच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले आणि पदवीधर आमदार अभिजित वंजारी यांच्या हस्ते भंडारा येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात त्यांना सन्मानित करण्यात आले.

विदर्भ माध्यमिक संघ, गोविंदराव वंजारी फाऊंडेशन आणि गोविंद-मैना फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हेमंत सेलिब्रेशन हॉल येथे हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. राठोड हे अध्यापनासोबत लेखन, कविता आणि समाजप्रबोधनाच्या क्षेत्रातही कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थी एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग परीक्षेत मोठ्या संख्येने सहभागी होतात. विद्यार्थ्यांच्या नृत्य व नाट्य प्रयोगांचे त्यांनी दिग्दर्शन केले आहे. विविध क्षेत्रांतील कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना पुरस्कार मिळाले आहेत. राठोड यांच्या सन्मानाबद्दल संस्था सचिव शेख, प्राचार्य इमरान शेख, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेतर्फे नुकताच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणभावराव सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. यावेळी उद्घाटक म्हणून केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक परिषदेचे नागपूर शहर अध्यक्ष राजेंद्र पटले हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सीनियर सॉफ्टवेअर आर्किटेक्ट हर्षल चौधरी, माजी शिक्षक आमदार नागो गाणार, माजी आमदार व भाजपा नागपूर विभाग पदवीधर नोंदणी प्रमुख सुधाकर कोहळे , माजी आमदार अनिल सोले शिक्षक परिषदेच्या महिला आघाडी प्रमुख पूजा चौधरी प्रमुख्याने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वृत्त हर्षल चौधरी यांच्या"Be the architect of your life" या पुस्तकाचे प्रकाशन नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनीषा कोलारकर, प्रास्ताविक प्रमोद बोढे तर आभार प्रदर्शन रुपेश रेवतकर यांनी केले.

## आ. आशिष देशमुख यांच्या हस्ते 'श्री'ची स्थापना



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख यांचे जनसंपर्क कार्यालयात डॉ आशिषबाबू देशमुख यांच्या हस्ते श्री गणपती बाप्पाच्या भव्य मुर्तीची स्थापना करण्यात आली. गणेश चतुर्थी च्या पावन पर्वावर शहरातील पामकोट लॉन येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत विधीवत पुजन,अभिषेक व महाआरती करूण श्री ची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे नागपुर जिल्हा ग्रामीण (काटोल) चे अध्यक्ष मनोहर कुंभारे, उपाध्यक्ष रामराव मोवाडे, सावनेर नगरपालिकेचे उपाध्यक्ष राजुभाऊ घुगल, पाणीपुरवठा सभापती महेश चकोले, नियोजन सभापती निलेश पटे, माजी नगरसेवक लक्ष्मीकांत दिवटे, हितज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड. पवन सातपुते,वैभव मखे सह सावनेर शहर व ग्रामीण चे अनेक कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## मातीच्या मूर्तीतून पर्यावरणाचा संदेश, एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूलमध्ये बाप्पा विराजमान!

### १५ वर्षांची गणेशोत्सवाची परंपरा कायम, विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूलमध्ये गेल्या १५ वर्षांपासून सुरू असलेली गणेशोत्सवाची पर्यावरणपूरक परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. सोमवारी दुपारी १.४५ वाजता शुभमुहूर्तावर गणरायाची विधिवत स्थापना करण्यात आली. गणेशमूर्तीच्या आगमनामुळे शाळेच्या परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.



शाळेत दरवर्षी गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यावर विशेष भर दिला जातो. याच उद्देशाने गेल्या १५ वर्षांपासून मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तीची स्थापना करण्याची परंपरा शाळेने जपली आहे. यंदाही आकर्षक आणि पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली.

शाळेचे संचालक कुलदीप हिवरकर व गिरीश शुक्ला यांच्या हस्ते गणरायाचे विधिवत पूजन करण्यात आले. मंत्रोच्चार, आरती आणि भक्तिमय वातावरणात गणपती बाप्पाचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावे, यासाठी शाळेत दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. पर्यावरणपूरक गणेशमूर्तीच्या स्थापनेतून 'निसर्गाचे रक्षण हीच खरी भक्ती' असा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा शाळेचा प्रयत्न आहे.

गेल्या दीड दशकापासून अखंडपणे सुरू असलेली ही परंपरा यंदाही कायम राहिल्याने विद्यार्थी व शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. गणरायाच्या आगमनाने शाळेचा परिसर भक्तीमय झाला असून, आगामी दिवसांत गणेशोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## राज्य कामगार विमा योजना रुग्णालय सोमवारी पेठ येथे दिनांक १७ सप्टेंबरपासून 'सेवा संकल्प अभियान'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली त्याचप्रमाणे आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा योजना मुंबई यांच्या आदेशानुसार राज्य कामगार विमा रुग्णालय, सोमवारी पेठ ,नागपूर येथे दिनांक १७ सप्टेंबर पासून ते १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सेवा संकल्प अभियान राबविल्या जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अंतर्गत रुग्णांना आणि विम्मेदार व त्याच्या कुटुंबीयांना या सेवा प्रकल्प अभियाना अंतर्गत आरोग्य तपासणी उपचार,जनजागृती तसेच विविध आजारांविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सामाजिक जनजागृती चे उपक्रम सुद्धा राबविल्या जाणार आहेत. यात प्रामुख्याने वृक्षारोपण, रक्तदान व अवयवदान जागरूकता शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, योग व ध्यान शिबिर,स्वच्छता शिबिर, व्यसनमुक्ती भारत जनजागृती शिबिर,महिलांचे आरोग्य व स्वच्छता,पोषण व रक्तालपता जनजागृतीची शिबिर,बालरोग शिबिर, अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून हा सेवा संकल्प अभियान राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, सोमवारी पेठ,नागपूर,येथील बाह्य रुग्ण विभागात व रुग्णालयात पार पडणार आहे. या उपक्रमाला वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर वैशाली व्यवहारे मॅडम ,डॉक्टर हर्षवर्धन कांबळे बाह्य रुग्ण विभाग प्रमुख हाताळणार आहेत. डॉक्टर प्रणव चांदेकर ,डॉक्टर फैजान खान,डॉक्टर स्वप्नील वाठोळे,डॉक्टर प्रशांत मेश्राम इत्यादी वैद्यकीय अधिकारी या संपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन पार पाडणार आहे.

# ऐतिहासिक परंपरेनुसार सिनियर भोंसला पॅलेस येथे श्री गणरायाचे पालखीतून आगमन

## २९८ वर्षांची परंपरा जपत विधिवत पूजाअर्चा व धार्मिक विधींनी प्रतिष्ठापना

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरच्या राजघराण्याची ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक परंपरा जपणाऱ्या सिनियर भोंसला पॅलेस येथे यंदाही श्री गणरायाचे पारंपरिक पद्धतीने मोठ्या भक्तिभावात आगमन झाले. इसवी सन १७२८ पासून सुरू असलेल्या परंपरेनुसार यंदा २९८ व्या वर्षी श्री गणरायाचे पालखीतून आगमन करण्यात आले. पारंपरिक मिरवणुकीतून गणरायाला सिनियर भोंसला पॅलेस येथे आणण्यात आले.



त्यानंतर मंत्रोच्चार, विधिवत पूजाअर्चा व धार्मिक विधी पार पाडून श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. नागपूरचे महाराज राजे मुधोजी भोंसले यांच्या निवासस्थानी दरवर्षी गणेशोत्सव पारंपरिक आणि श्रद्धापूर्ण वातावरणात साजरा केला जातो. या उत्सवाला धार्मिक महत्त्वासोबतच नागपूरच्या राजघराण्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणूनही विशेष महत्त्व आहे.



पारंपरिक स्वरूपाचे जतन सिनियर भोंसला पॅलेस येथील गणरायाचे वैशिष्ट्य म्हणजे आज देखील जपले जाणारे पारंपरिक स्वरूप. राजघराण्याच्या परंपरेनुसार श्री गणरायाला विशेष पगडी परिधान केली जाते. तसेच गणेशमूतीर्चा रंग, आकार, उंची व स्वरूप यामध्ये परंपरेनुसार सातत्य राखले जाते. २९८ वर्षांची ही ऐतिहासिक परंपरा आजही कायम ठेवत गणरायाची पालखीतून आगमन व धार्मिक विधींनी प्रतिष्ठापना केली जाते. त्यामुळे सिनियर भोंसला पॅलेस येथील गणेशोत्सव हा नागपूरच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारशातील एक मानाचा सोहळा ठरला आहे.

## न्यू सहकार नगर येथे भव्य तान्हा पोळा

### महापौर नीता ठाकरे व आमदार मोहन मते यांच्या हस्ते बक्षीस वितरण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
रमणा मारोती परिसरातील न्यू सहकार नगर येथे न्यू सहकार नगर विकास बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने भव्य तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार मोहन मते व महापौर नीता ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होत्या. यावेळी वेशभूषा स्पर्धा व नंदी सजावट स्पर्धेची आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी स्पर्धकांना बक्षीस म्हणून सायकल तसेच स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी संजय ढवळे, नितीन चौधरी, मनोज धकाते, रंजना चौधरी, राजेंद्र मेहरे, चंदू चव्हाण, कार्तिक ठाकरे, योगेश मेश्राम, कमलेश चौधरी व इतर नगरवासी यांनी सहकार्य केले.

थोडक्यात

## ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे संचालकावर तुमसर पोलीसांची कारवाई




**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी मा जिल्हाधिकारी सा भंडारा यांचे कार्यालयीन अध्यादेशक्र. अका/दंड-१/कावि-३४५/२०२६ दि ४/९/२०२६ अन्वये सण उत्सवामध्ये कर्णकर्कश सांउड डॉल्बी डिजे सिस्टीम वर तसेच वाहतुक करणारा वाहनावर बंदी असल्याबाबतचा अध्यादेशाचे उल्लंघन होतांना दिसुन आल्याने संबंधित डॉल्बी डिजे संचालकावर तुमसर पोलीसांकडुन कारवाई करण्यात आली आहे.

सविस्तर प्रकरण असे की, दि. १२/०९/२०२६ रोजी रात्री १० वा डॉल्बी डिजे मालक हिमेश रामजी राणे वय २४ वर्ष रा. मीठेवानी तुमसर ता तुमसर जि. भंडारा याने त्याचे मालकीचा डॉल्बी डिजे तुमसर येथील श्री. गणेश आगमन मिरवणुकी निमीत्त वाजविण्यात येत होते दरम्यान सदर मंडळाचे गणपती मिरवणूक ही कोडवानी दवाखाना हॉस्पीटल जवळ आली असता तसेच सदर डिजेचा आवाज कर्णकर्कश तसेच जोर जोराने असल्याच्या गोपनीय माहीतीवरून पोलिस स्टेशन तुमसर येथील ध्वनीप्रदुषण नियंत्रण पथक सदर ठिकाणी सोबत कॅसीलो कपंनीचे सॉउड लेवल मिटर घेवुन पोहचले व सर नॉईस लेव्लल मिटरने डिचेच्या आवाजाची तिव्रता मोजली असता मशीनमध्ये L-Aeq 89.9 db दिसून आल्याने डीजे साऊंड सिस्टिमची ध्वनी पातळी निर्धारित मयार्देपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले. सदर डिजे च्या संचालकाकडुन ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी संबंधित डीजे चालक/मालक यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० आणि इतर लागू कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली असून डीजे साऊंड सिस्टिम जप्त करुन पोलीस स्टेशन ला जमा करण्यात आले आहे. पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. सदरची कारवाई नूरुल हसन पोलीस अधिक्षक सा. भंडारा, निलेश मोरे अपर पोलीस अधिक्षक सा. शिवम विसापुरे उपविभागीय पोलीस अधिकारी सा. उपविभाग तुमसर, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुभाष बारसे ठाणेदार पो. स्टे. तुमसर यांचे आदेशान्वये पो. स्टे. तुमसर येथील पो. नी. बाळासाहेब आघाव, तसेच ध्वनी प्रदुषण नियंत्रण पथकातील पोउपनी प्रविण सयाम, पो. शी. नामदेव बळदे, पो. शी. चेतन कुरंजेकर, पोशी. तिलक चौधरी, मपोशी प्रिती कडव यांनी केलेली आहे. नागरिकांनी धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांदरम्यान ध्वनीवर्धकांचा वापर करणे टाळावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा तुमसर पोलीस स्टेशनतर्फे देण्यात आला आहे.

ध्वनी प्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास होऊ शकतो. सार्वजनीक गणेश उत्सव साजरे करतांना पर्यावरणपुरक व पारंपारीक पध्दतीने साजरा करावा. त्यामुळे सर्व गणेश मंडळे व नागरिकांनी ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबत सहकार्य करावे व कोणत्याही प्रकारचे उल्लंघन आढळल्यास त्वरित पोलीसांना माहिती द्यावी.

**– सुभाष बारसे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन तुमसर**

## अखिल खेडुला समाज नागपूरच्या नवीन कार्यकारिणीची आमसभेत एकमताने निवड



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल खेडुला समाज, नागपूरच्या कार्यकारिणीची आमसभा रविवारी १३ सप्टेंबर रोजी, समाजभवनात उत्साहपूर्ण व एकोप्याच्या वातावरणात पार पडली. यावेळी नवीन कार्यकारिणीचे गठण सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी करण्यात आले. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी श्री. देवाभाऊ ढोरे आणि सचिवपदी नंदकिशोर अलोने यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी अरुणभाऊ राऊत व अरुणभाऊ ठेंगरे, सहसचिवपदी दयारामजी सहारे व वसंतराव दोनाडकर, तर कोषाध्यक्षपदी भीमरावजी कांमडी यांची निवड करण्यात आली. इतर संचालक मंडळ मोरेश्वर दोनाडकर, मनोहर कुथे, चंद्रकांत राऊत, दिनेश तुपटे, प्रमोद खरकाटे, रौनक शिकारी, संकेत राऊत, अमोल पिलारे, धनराज शिलारे, पुरुषोत्तम भोयर, अजय ठाकूर, सुनील दोनाडकर, जितेंद्र सौंदरकर व कैलाशजी बगमारे यांची संचालक म्हणून निवड करण्यात आली. आमसभेत नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले. समाजाची एकजूट अधिक बळकट करण्या सोबतच सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक उपक्रमांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून समाजहितासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जातील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे अभियंता दिन सोहळा १५ सप्टेंबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर लोकल सेंटरतर्फे मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथील संस्थेच्या परिसरात ५९वा अभियंता दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यंदाच्या सोहळ्याची संकल्पना 'शाश्वत आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने स्वावलंबी भारतासाठी अभियांत्रिकीतील उत्कृष्टता' अशी असून, शाश्वत विकासाला चालना देणे तसेच भारताची तांत्रिक आत्मनिर्भरता बळकट करण्यासाठी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका यावर प्रकाश टाकला जाणार आहे. कुमार आशीर्वाद, आयएएस, जिल्हाधिकारी हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते असतील. आनंद संचेती, संचालक, एसएमएस लिमिटेड हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर लोकल सेंटरचे चेअरमन डॉ. संदीप शिरखेडकर व मानद सचिव इंजिनिअर जयंत जोशी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# अंधश्रद्धेला प्रश्न विचारत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारे सुरेश झुरमुरे यांचा आदर्श माजी विद्यार्थी सन्मानाने गौरव

### प्रामाणिकपणा, विवेकवाद आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव, प्लास्टिकच्या दुष्परिणामांवरही परिसंवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**

समाजात रूढ झालेल्या अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा आणि भोंदूगिरीला विरोध करत बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि माणुसकीचा विचार सातत्याने समाजापर्यंत पोहोचविणारे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे यांना जीवन विकास विद्यालय माजी विद्यार्थी परिवाराच्या वतीने 'आदर्श माजी विद्यार्थी सन्मान २०२६' देऊन गौरविण्यात आले. जीवन विकास विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून केवळ एका व्यक्तीचा सत्कार झाला नाही, तर विवेकाने विचार करणाऱ्या आणि समाजातील चुकीच्या प्रथा-परंपरांना प्रश्न विचारण्याच्या विचारधारेचा सन्मान करण्यात आला.

झुरमुरे यांनी १९८२ पासून प्रा. श्याम मानव यांच्या सोबत अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीत सक्रिय योगदान दिले आहे. भानामती, जादूटोणा, भोंदूबाबा व भोंदूगिरीचा पदार्फाश करण्यापासून ते समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी व्याख्याने, शिबिरे, कार्यशाळा आणि जनजागृतीपर कार्यक्रमांपर्यंत त्यांनी सातत्याने कार्य केले. जादूटोणाविरोधी कायद्याच्या निर्मितीसाठी झालेल्या सामाजिक चळवळीतही त्यांचा सहभाग राहिला आहे. यासोबतच रक्तदान, नेत्रदान, देहदान आणि अवयवदान यांसारख्या मानवतावादी उपक्रमांतून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी सनदी अधिकारी ई. झेड. खोब्रागडे, न्यूरॉलॉजिस्ट डॉ. चंद्रशेखर मेश्राम, आमदार संजय मेश्राम, ज्येष्ठ माजी संपादक बाळ कुलकर्णी, अध्यक्ष अरविंद बाकडे, तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापिका विभा भुसारी, शोभाताई झुरमुरे यांची उपस्थिती होती.



यावेळी ई. झेड. खोब्रागडे यांनी सुरेश झुरमुरे यांच्या कायार्चा गौरव करताना त्यांच्या प्रामाणिकपणाच्या आठवणी सांगितल्या. उमरेडचे एसडीओ असताना १९८२ मध्ये झुरमुरे यांच्यासोबत काम केल्याचे सांगून त्यांनी निवडणुकीच्या काळातील आर्थिक व्यवहार त्यांच्याकडे सोपविल्याचे नमूद केले. त्यांच्या प्रामाणिक आणि काटेकोर कामामुळे उमरेड विभागाचा निवडणूक खर्च जिल्ह्यात सर्वांत कमी राहिला होता, अशी आठवण त्यांनी सांगितली. 'प्रामाणिक माणूस सोन्यासारखा समाजात चमकतो,' असे सांगत त्यांनी झुरमुरे यांच्या कार्याचे कौतुक केले.

**प्लास्टिकमुळे मानवी आरोग्याला वाढता धोका**

कार्यक्रमातील डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांचे प्लास्टिकचे मानवी मेंदूवर परिणाम या विषयावरील व्याख्यान विशेष लक्षवेधी ठरले. प्लास्टिकचा वाढता वापर केवळ पर्यावरणाचा प्रश्न नसून तो मानवी आरोग्याशीही जोडला गेला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

हवा, पाणी, अन्न आणि दैनंदिन जीवनाच्या माध्यमातून प्लास्टिकशी होणारा संपर्क वाढत असून त्याचे मानवी शरीरावर आणि मेंदूवर होणारे परिणाम गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विविध आजारांच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर प्लास्टिकविरोधी जनचळवळ उभी राहणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**स्वागतगीतापासून मानपत्रापर्यंत उत्साहपूर्ण आयोजन**

कार्यक्रमाची सुरुवात जीवन विकास वनिता विद्यालयातील विद्यार्थिनी व शिक्षकांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली. मान्यवरांचे स्वागत केशव माणूसमारे, प्रणय पराते, मनोज ठकरे, राजेश वानखेडे, मोहन चिचुलकर, अँड. प्रेरणा तोवर, वनिता मोटघरे, प्रकाश वारे आणि उज्वला धंदरे (झुरमुरे) यांनी केले.

सुरेश झुरमुरे यांचा परिचय व मानपत्राचे वाचन विवेक सातेलवार आणि राजेश वानखेडे यांनी केले. जीवन शिक्षण मंडळाचे सचिव प्रशांत सपाटे यांनी प्रास्ताविक केले. माजी विद्यार्थी डॉ. मधुलता व्यास, विभाताई भुसारी आणि विकास झाडे यांनी मनोगत व्यक्त केले. बाळ कुलकर्णी यांनी शेरोशायरीच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद बाकडे यांनी पर्यावरण, अंधश्रद्धा निर्मूलन आणि सुरेश झुरमुरे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला.

साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर लांजेवार, नत्थुजी मेश्राम, शरद व्यवहारे, मधुकर फुकट, राम तांबडे, प्रभाकर नागपुरे, दादूजी गोखले आणि सोमकुवर सर यांच्या उपस्थितीत सुरेश झुरमुरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभय लांजेवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन मोहन चिचुलकर यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी, नगरसेवक, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार आणि कुटुंबीय उपस्थित होते. अंधश्रद्धेऐवजी विज्ञान, रूढीऐवजी विवेक आणि निराशेऐवजी माणुसकीचा विचार समाजात रुजविणाऱ्या कायार्चा गौरव म्हणून आदर्श माजी विद्यार्थी सन्मान २०२६ या कार्यक्रमाला विशेष वैचारिक महत्त्व प्राप्त झाले.

# कला शिक्षक कन्नाके यांचा दुहेरी सन्मान

### शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते आणि 'कर्तृत्व सन्मान' सोहळ्यात गौरव





**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

येथील जनता विद्यालयाचे उत्कृष्ट कला शिक्षक सचिन सितारामजी कन्नाके यांना कला व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या बहुमूल्य योगदानाबद्दल दोन वेगवेगळ्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांना 'चला शाळेत जाऊया शिक्षक संवाद कार्यक्रमात' आयडॉल शिक्षक म्हणून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या शुभहस्ते सचिन कन्नाके यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्याचप्रमाणे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सन्मान कर्तुत्वाचा' उत्कृष्ट शिक्षक सन्मान सोहळा २०२६ अंतर्गत त्यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार जाहीर झाला.

भंडारा येथील हेमंत सेलिब्रेशन हॉलमध्ये आयोजित एका भव्य सोहळ्यात कन्नाके यांना त्यांच्या सहपरिवारासह या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या उत्तुंग दुहेरी यशामुळे मौदा परिसर आणि शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले असून जनता विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. कन्नाके यांच्या या यशाबद्दल पंचायत समिती शिक्षण विभागाचे अधिकारी संकेत मरसकोल्हे, नेवारे मॅडम, चौधरी मॅडम, गभणे मॅडम, मस्के सर, कातखेडे मॅडम आणि शिल्पा सूर्यवंशी मॅडम यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.तसेच जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल मेश्राम यांनी कन्नाके यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. उपमुख्याध्यापक नामदेव तांबडे, उपप्राचार्य मधुकर बाभरे, पर्यवेक्षक यशवंत मस्के आणि गजेंद्र नासरे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक दिलीप इंगोले, सचिन मोरया, पराग लिमजे, शरद आमदरे, पायल शहारे, किरण कन्नाके आणि भाग्यश्री लाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सचिन कन्नाके यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आनंदोत्सव साजरा केला.

# निर्मल नगरीत श्रींचा ऋषिपंचमी उत्सव आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या वतीने श्री गजानन महाराजांचा पुण्यतिथी उत्सव अर्थात ऋषिपंचमी सोहळा मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी भक्तिभावाने आयोजित करण्यात आला आहे. संत श्री गजानन महाराजांनी भाद्रपद शुद्ध पंचमी अर्थात ऋषिपंचमीच्या दिवशी, ८ सप्टेंबर १९१० रोजी शेगाव येथे संजीवन समाधी घेतली होती. त्यामुळे ऋषिपंचमी हा दिवस श्रींच्या पुण्यतिथीचा पवित्र दिवस म्हणून भक्तिभावाने मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्त सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत श्रींचा अभिषेक होणार असून, सकाळी ११ वाजता महाआरती होईल. दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ६ वाजल्यापासून भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. या पवित्र उत्सवात शहरातील श्री गजानन महाराज भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दर्शन, अभिषेक, भजन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.



# बेलोनातील दहीहंडीला राजकीय रंग!

### गोविंदांच्या थरारासोबत भाजपमधील स्थानिक वर्चस्वाची चुरस, आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या उपस्थितीत शाब्दिक खडाजंगीची ठिणगी



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील बेलोना या छोट्याशा गावात १२ व १३ सप्टेंबर रोजी झालेल्या दोन दहीहंडी उत्सवांना यंदा गोविंदांच्या थरारासोबतच राजकीय रंग चढल्याचे चित्र पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, दोन्ही कार्यक्रमांना आमदार चरणसिंग ठाकूर यांची उपस्थिती असतानाही स्थानिक पातळीवरील राजकीय वर्चस्वाची चुरस प्रकषार्ने जाणवली. त्यामुळे बेलोनातील दहीहंडीची चर्चा आता केवळ उत्सवापुरती मर्यादित न राहता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या राजकीय समीकरणांशी जोडली जात आहे.

१२ सप्टेंबर रोजी उकेश चव्हाण यांच्या पुढाकाराने, तर १३ सप्टेंबर रोजी अज्जू ठाकूर, कुणाल ढबाले व भीमा भागवतकर यांच्या पुढाकाराने स्वतंत्र दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. नरखेड तालुक्यातील बेलोना येथे प्रथमच सलग दोन दिवस दोन स्वतंत्र दहीहंडी आयोजित झाल्याने सुरुवातीपासूनच या कार्यक्रमांकडे ग्रामस्थांसह राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते. दोन्ही कार्यक्रमांमध्ये गोविंदा पथकांचा उत्साह आणि नागरिकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

दहीहंडीच्या निमित्ताने भाजपमधील स्थानिक पातळीवर कोणाचा प्रभाव अधिक, याची जणू अप्रत्यक्ष चाचपणीच होत असल्याची चर्चा गावात रंगली. कार्यक्रमातील उपस्थिती, कार्यकर्त्यांची गर्दी आणि राजकीय नेत्यांच्या सहभागावरूनही स्थानिक राजकीय गोटांमध्ये चर्चांना उधाण आले.

१३ सप्टेंबरच्या दहीहंडी कार्यक्रमात वातावरण काही काळ अधिकच तापले. आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या उपस्थितीत काही कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमकीची परिस्थिती निर्माण झाली. वाद वाढला नाही आणि परिस्थिती नियंत्रणात राहिली; मात्र या प्रकारामुळे स्थानिक राजकारणातील अंतर्गत चुरस पुन्हा एकदा समोर आल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती.

बेलोना गाव आकाराने छोटे असले तरी येथील दोन दहीहंडी कार्यक्रमांनी संपूर्ण नरखेड तालुक्याचे लक्ष वेधले. कार्यक्रमाच्या निमित्ताने झालेली राजकीय उपस्थिती, कार्यकर्त्यांची जमवाजमव आणि स्थानिक पातळीवरील वर्चस्वाची स्पर्धा यामुळे जणू विधानसभा मतदारसंघातील राजकीय शक्तिप्रदर्शनाचीच छोटी झलक पाहायला मिळाल्याची चर्चा आहे.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बेलोनातील या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उमेदवारी, स्थानिक नेतृत्व आणि राजकीय वर्चस्वाचा प्रश्न पुढील काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दहीहंडीच्या निमित्ताने दिसून आलेली राजकीय चुरस ही आगामी निवडणुकीतील संघर्षाची सुरुवात आहे का, याबाबत आता राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू झाले आहेत. आमदारांच्या उपस्थितीतच कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वादाची ठिणगी पडण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने आगामी काळात नरखेड तालुक्यातील स्थानिक राजकारण कोणते वळण घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे बेलोनातील दहीहंडीने यंदा गोविंदांच्या थरारासोबतच नरखेड तालुक्यातील आगामी राजकीय संघर्षाची नांदी दिली आहे का, हा प्रश्न चर्चेचा विषय ठरला आहे.

थोडक्यात

## उत्कृष्ट पदाधिकारी म्हणून कराळे, पराते यांचा सन्मान



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे नागपूर महानगर कार्याध्यक्ष अरुण कराळे व कोषाध्यक्ष गंगाधर पराते यांचा उत्कृष्ट पदाधिकारी म्हणून सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक व शिक्षिकांचाही गौरव करण्यात आला. मॉडेल ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका सरिता मिझापूरे यांना उत्कृष्ट प्राध्यापक, प्रशांत माध्यमिक विद्यालयाच्या छाया गोस्वामी यांना उत्कृष्ट मुख्याध्यापिका, तर सरस्वती विद्यालयाचे साईप्रसाद उमक यांना उत्कृष्ट शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. भंडारा येथील हेमंत सेलिब्रेशन येथे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, स्व. गोविंदराव वंजारी फाउंडेशन नागपूर व गोविंद मैना फाउंडेशन चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने माजी आमदार स्व. ना. बा. सपाटे व स्व. दत्तात्रय मिझापूरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रविवार, १३ सप्टेंबर रोजी हा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा शिक्षक आमदार सुधाकर अडबाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पदवीधर आमदार अभिजित वंजारी यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार तथा सरचिटणीस व्ही. यू. डायगव्हाणे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, गोविंद मैना फाउंडेशनच्या अध्यक्षा सीमा अडबाले, विमाशि संघाचे प्रांतीय कोषाध्यक्ष भूषण तल्हार, महानगर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, कार्यवाह अविनाश बडे, अंकिता कराळे, कर्णबोधी मांडवे, प्रमोद अंधारे व राजू मोहोड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महानगर कार्यवाह अविनाश बडे यांनी केले. शिक्षक व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करून त्यांच्या कार्याची दखल घेण्याचा हा उपक्रम असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## गडमंदिर नरसिंग नागव्दार स्वामी कढई व महाप्रसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नरसिंग नागव्दार स्वामी सेवा मंडळ कालीदास स्मारक गडमंदिर



येथे मंडळातर्फे ऋषीपंचमी निमित्त दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्याने सोमवारला भजन संध्या कार्यक्रम आज मंगळवार ला तीन वाजता भजन कार्यक्रम व सायं. ५ वाजता "कढई व महाप्रसादाचे आयोजन गडमंदिर नरसिंग मंदिर, कालीदास स्मारक जवळ गडमंदिर परिसरात करण्यात आले. असून या कार्यक्रमामध्ये भक्तांनी लाभ घेण्याचे आव्हान नरसिंग नागव्दार स्वामी सेवा मंडळाचे भुषण महाजन, गुलाब महाजन, गौरव समरीत, योगेश धावडे, धीरज हटवार, दुर्गेश महाजन, वैभव सलामे, राजेश बावणे, धनराज महाजन, रावजी धारणे, ललित कनोजे यांनी केले.

## रामटेक तालुक्यात दुसऱ्या यादीत ८२८ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा

### आतापर्यंत २,०७८ शेतकरी झाले लाभार्थी

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत रामटेक तालुक्यातील दुसऱ्या



यादीत ५३ गावांतील ८२८ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. पहिल्या यादीत १ हजार २५० शेतकरी खातेदारांना लाभ मिळाला होता. त्यामुळे आतापर्यंत तालुक्यातील २ हजार ७८ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळाला आहे. रामटेक तालुक्यात सुमारे ४ हजार शेतकरी या योजनेसाठी पात्र असून, पहिल्या व दुसऱ्या यादीत नाव नसलेल्या पात्र शेतकऱ्यांची नावे पुढील यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत. राष्ट्रीयीकृत, खासगी, ग्रामीण तसेच सहकारी बँकांनी पात्र लाभार्थ्यांची यादी तयार केली आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसह इतर बँकांतील पात्र शेतकऱ्यांचाही यामध्ये समावेश आहे.

या योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले पीक कर्ज तसेच ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची थकबाकी विचारात घेण्यात आली आहे. जमीनधारणेच्या कमाल मर्यादेसह काही जाचक अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. बँकांनी पात्र लाभार्थ्यांचा तपशील शासनाच्या पोर्टलवर अपलोड केला आहे. लाभार्थ्यांनी सेतू किंवा 'आपले सरकार' सेवा केंद्रात जाऊन बायोमेट्रिक ओळख प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कर्जमाफीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. रामटेक तालुका सहकारी संस्थेचे सहायक निबंधक अतुलकुमार वानखेडे यांनी पात्र शेतकऱ्यांनी तातडीने बायोमेट्रिक ओळख प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन केले आहे. लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालय, सहायक निबंधक कार्यालय, विविध कार्यकारी संस्था, ग्रामपंचायती तसेच बँक शाखांच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# पर्यावरणपूरक विसर्जन कुंड व निर्माल्य रथांचे लोकार्पण

### महापौर निता ठाकरे यांनी दाखविली निर्माल्य रथांना हिरवी झेंडी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेने शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी शहरात ४१९ कृत्रिम विसर्जन कुंडाची निर्मिती केली आहे. या विसर्जन कुंडांचे लोकार्पण महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते फुटाळा तलाव परिसरात झाले. त्याचप्रमाणे गणेशोत्सव काळात जमा होणारे निर्माल्याचे संकलन करण्यासाठी मनपाने १८ निर्माल्य रथ तयार केले आहेत. या निर्माल्य रथांना सुद्धा महापौर निता ठाकरे यांनी मनपाच्या मुख्यालयात हिरवी झेंडी दाखविली.

मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या परिसरात आज (ता. १४) निर्माल्य संकलनातून पर्यावरण व्यवस्थापन लोकजागृती अभियानाअंतर्गत निर्माल्य रथांना हिरवी झेंडी दाखवून महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी लोकार्पण केले. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, आयुक्त डॉ. विपीन, नगरसेवक योगेश पाचपोर, नगरसेवक अभिजीत झा, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील लोखंडे उपस्थित होते.

शहरात गणेशोत्सवाचे आगमन झाल्यानंतर गणेश विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे, यासाठी मनपाचे शहरातील विविध ठिकाणी ४१९ वर कृत्रिम तलाव तयार केले आहेत. मोठ्या आकाराच्या गणेशाच्या मूर्तीच्या विसर्जनासाठी गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी, लकडगंज भागातील कच्छी विसा व कोराडी येथे मोठे तलाव बांधले आहेत. परंतु श्री गणेशाच्या लहान मूर्तीच्या विसर्जनासाठी शहरात विविध भागात कृत्रिम तलाव तयार केले आहेत.

**कृत्रिम तलावांचा वापर करावा- महापौर**

यावेळी बोलताना महापौर निता ठाकरे म्हणाल्या, शहरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहाने श्री गणेशाचा आगमन झाले आहे. दीड दिवसानंतर श्री गणेशाच्या मूर्तीच्या विसर्जनाला सुरूवात होते. नागरिकांनी मूर्तीचे विसर्जन तलाव, विहिरी किंवा नाल्यात करण्याऐवजी मनपाने तयार केलेल्या कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करावे. यामुळे नैसर्गिक जलस्त्रोत प्रदूषित होणार नाही. यासाठी डीजीटल पद्धतीने नागरिकांना कृत्रिम तलावांची माहिती सुद्धा मिळणार आहे.

**कृत्रिम तलावांची माहिती मोबाईलवर**

शहरात कृत्रिम तलाव कुठे आहे याची माहिती जाणून घेण्यासाठी नागरिकांना कुठेही जाण्याची आवश्यकता नाही. कृत्रिम विसर्जन तलाव शोधा, यासाठी मनपाने क्यूआर कोड आणि संकेतस्थळ https://ganpati-zone-map.emergent.host तयार केला आहे. हा क्यूआर कोड मोबाईलवर स्कॅन केल्यानंतर आपल्या घराजवळ कुठे कृत्रिम तलाव आहे. याची माहिती झोननिहाय मिळेल तसेच तेथे जाण्यासाठी दिशादर्शक गुगल मॅप सुद्धा उपलब्ध राहणार आहे. क्यूआर कोड मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यासंदर्भात मनपाने तयार केलेल्या फलकांचे प्रकाशन महापौर निता ठाकरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये झाले.

**निर्माल्य रथासाठी टोल फ्री नंबर**

निर्माल्य रथासंदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी नागरिकांसाठी मनपाने १८००२६७७९६६ हा टोल फ्री लोकांसाठी उपलब्ध केला आहे.

# 'वॉशिंग्टन पोस्ट मॅगझिन'च्या मुखपृष्ठावर डॉ. दत्ता विघावे

### सेवा, क्रिकेट आणि सामाजिक कार्याचा जागतिक गौरव, बहुआयामी कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल

**दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर**

क्रिकेट, सामाजिक सेवा, शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि मानवतावादी उपक्रमांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत सातत्याने कार्यरत असलेले ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक, पंच, लेखक व समाजसेवक डॉ. दत्ता विघावे यांच्या बहुआयामी कार्याची दखल आता 'वॉशिंग्टन पोस्ट मॅगझिन'च्या सप्टेंबर २०२६च्या विशेषांकाने घेतली आहे. या विशेषांकाच्या मुखपृष्ठावर डॉ. विघावे यांना मानाचे स्थान देण्यात आले असून, त्यांच्या कार्यप्रवासाचा सचित्र परिचय पाच पानांत मांडण्यात आला आहे.

मुखपृष्ठावर "DR. DATTA VIGHAVE – A LIFE OF SERVICE, CRICKET AND GLOBAL RECOGNITION" असा ठळक उल्लेख करण्यात आला आहे. त्याचबरोबर "Turning Passion into a Greater Purpose" या संकल्पनेतून क्रिकेटची आवड, सामाजिक बांधिलकी आणि व्यापक मानवतावादी दृष्टिकोन यांचा संगम अधोरेखित करण्यात आला आहे. 'सेवा निर्माण करते अधिक सक्षम उद्याची वाट' हा संदेशही विशेषत्वाने मांडण्यात आला आहे.

**१५ हजारांहून अधिक कोरोना योद्ध्यांचा सन्मान**

कोरोना महामारीच्या कठीण काळात निस्वार्थपणे सेवा करणाऱ्या देशभरातील १५ हजारांहून अधिक कोरोना योद्ध्यांचा सन्मान करण्याचा उपक्रम डॉ. विघावे यांच्या सामाजिक कार्यातील विश्वविक्रमी टप्पा ठरला. डब्ल्यूसीपीएच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. त्यांच्या या कायार्ची विविध स्तरांवर दखल घेण्यात आली असून, जागतिक संसदेचे अध्यक्ष डॉ. ग्लेन मार्टिन यांच्यासह मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.




**क्रिकेटशी आयुष्यभराची नाळ**

डॉ. विघावे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा केंद्रबिंदू असलेल्या क्रिकेट क्षेत्रातील त्यांचे योगदानही उल्लेखनीय आहे. पंच, प्रशिक्षक, समीक्षक आणि लेखक अशा विविध भूमिकांत त्यांनी क्रिकेटशी नाते जपले. पिता-पुत्र जोडीने सलग अधिकृत क्रिकेट सामन्यांत पंचगिरी करण्याचा विक्रम त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीतील वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. त्यांच्या नावावर विविध संस्थांकडून मान्यताप्राप्त सहा विश्वविक्रम असल्याचे नमूद करण्यात आले आहे. क्रिकेटवरील त्यांचे लेखनही तितकेच व्यापक आहे. वृत्तपत्रे आणि विविध माध्यमांतून त्यांनी १३ हजारांहून अधिक क्रिकेटविषयक लेख लिहिले असून, नियम, पंचगिरी, खेळाडू, तंत्र, किस्से तसेच क्रिकेटविश्वातील श्रद्धा-अंधश्रद्धा अशा विविध विषयांना त्यांनी आपल्या लेखणीतून स्पर्श केला आहे.

**क्रिकेटवर पाच पुस्तके; पंचगिरीवर स्वतंत्र विचार**

क्रिकेट विषयावरील त्यांच्या पुस्तकांनाही विशेष महत्त्व आहे. 'क्रिकेट लॉज अँड क्लॉज', 'वादाच्या दुनियेतील पंचगिरी', 'अंपायरींग - अ थँकलेस बट नोबल जॉब' आणि 'क्रिकेटपटू - श्रद्धाळू की अंधश्रद्धाळू?' यांसारख्या पुस्तकांतून त्यांनी क्रिकेटविषयक वेगवेगळ्या पैलूंवर भाष्य केले आहे. पंचगिरीकडे केवळ निर्णय देण्याची भूमिका म्हणून न पाहता, ती 'अत्यंत उदात्त पण कृतघ्नतेचे काम' असल्याचे त्यांनी आपल्या लेखनातून मांडले आहे. कविता, कथासंग्रहही त्याच्या लेखनीतून साकारले आहेत.

**शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी**

ग्रामीण व वंचित घटकांपर्यंत शिक्षणाचा प्रसार, सामाजिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांतही डॉ. विघावे कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक कायार्ची दखल घेत त्यांना महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. क्रिकेट क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना मानद डॉक्टरेट तसेच डी.लिट. यांसारख्या सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

सामाजिक बांधिलकी आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्याच्या भूमिकेतून त्यांनी स्वतःहून जातीनिहाय आरक्षणाचा लाभ न घेण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

**अंतराळविषयक उपक्रमांमध्येही नावाची नोंद**

डॉ. विघावे यांच्या कायार्चा आवाका क्रीडा व सामाजिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. नासा, रशियाच्या जिओस्कॅन उपग्रह प्रकल्प तसेच ऑस्ट्रेलियातील ग्रिफिथ विद्यापीठाशी संबंधित शैक्षणिक मोहिमांमध्ये त्यांच्या नावाची मानद नोंद झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे क्रीडा, साहित्य आणि सामाजिक कार्याबरोबरच विज्ञान-शैक्षणिक उपक्रमांशी जोडले गेलेले त्यांचे नाव विशेष ठरते.

**पद्मश्रीसाठी नामांकन; अनेक सन्मानांची शिदोरी**

डॉ. विघावे यांना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून अनेक पुरस्कार व सन्मान मिळाले आहेत. 'पद्मश्री' पुरस्कारासाठी त्यांचे नामांकन झाले असून त्याची नोंदणी क्रमांक ५०६१३९६ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. भारत सरकारच्या टपाल विभागाच्या 'माय स्टॅम्प' उपक्रमातून त्यांच्या सन्मानार्थ विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे. तसेच 'एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी पिपल ऑफ इंडिया" या आउटस्टँडिंग १०० इंडियन्स च्या यादीत त्यांना स्थान मिळाल्याचे नमूद आहे.

**वॉशिंग्टन पोस्ट मॅगझिनचे मुखपृष्ठ ठरले नवा मानबिंदू**

क्रिकेटचे मैदान, पंचगिरी, सातत्यपूर्ण लेखन, सामाजिक सेवा, शिक्षण, पर्यावरण आणि जागतिक स्तरावरील विविध उपक्रम अशा अनेक वाटांनी पुढे गेलेल्या डॉ. दत्ता विघावे यांच्या कार्यप्रवासाला वॉशिंग्टन पोस्ट मॅगझिनच्या मुखपृष्ठावर मिळालेले स्थान हा अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे.

# शीतल माता गोविंदा पथकाचा सलग दुसऱ्यांदा दहीहंडी फोडण्याचा विक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
**(धनंजय पांढरे)**

द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट आणि बाळू भाऊ मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू इंग्लिश शाळेच्या मैदानावर आयोजित भव्य दहीहंडी महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या महोत्सवात बाबुपेठ येथील शीतल माता गोविंदा पथकाने सलग दुसऱ्यांदा उत्तुंग मानवी मनोरा रचत दहीहंडी फोडून १ लाख ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवत पथकाने नवा विक्रम प्रस्थापित केला.

महोत्सवाला खासदार प्रतिभा धानोरकर यांची विशेष उपस्थिती होती. प्रशासनाच्या सूचना आणि नियमांचे पालन करून डीजे वाजविल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. आगामी काळात येणाऱ्या सर्व सण-उत्सवांमध्ये नागरिक व मंडळांनी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करूनच डीजे वाजवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राजुरा नगराध्यक्ष अरुण धोटे, वरोरा नगराध्यक्षा अर्चना ठाकरे, मूल नगराध्यक्षा एकता समर्थ, बल्लारपूर नगराध्यक्षा अल्का वाढई, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा कुंदा जेणेकर,



शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष शिवा राव, चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे काँग्रेस गटनेते सुरेंद्र अडबाले, नगरसेवक तसेच विविध नगरपरिषदांचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महोत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १८ वर्षांवरील महिलांसाठी झालेल्या रस्सीखेच स्पर्धेत टग ऑफ वॉर संघाने प्रथम क्रमांक पटकावत १० हजार रुपये व चषक मिळविला. इरई संघाने द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार रुपये व चषक, तर आझाद गोल्डन संघाने तृतीय क्रमांकासाठी ५ हजार रुपये व चषक पटकाविला.

५ ते १० वर्षे वयोगटातील मुलांसाठी भारतातील थोर महापुरुष या विषयावर वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. यात शिफा पवार हिने प्रथम क्रमांकासह ५ हजार रुपये व चषक, संजीवन पवार याने द्वितीय क्रमांकासह ३ हजार रुपये व चषक, तर अहिल्या लालसरे हिने तृतीय क्रमांकासह २ हजार रुपये व चषक पटकाविला.

संध्याकाळी मुख्य आकर्षण ठरलेल्या भाऊंची दहीहंडी स्पर्धेत गोविंदा पथकांनी उत्साहात सहभाग घेतला. गोविंदा आला रे'च्या गजरात मानवी मनोरे रचण्यात आले. अखेर शीतल माता गोविंदा पथक, बाबुपेठ यांनी थरारक कामगिरी करत दहीहंडी फोडली आणि १ लाख ५१ हजार रुपये रोख तसेच भव्य चषकाचा मान मिळविला. विजेत्या खेळाडू व गोविंदा पथकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक व न्यायालयाच्या नियमांनुसार आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून महोत्सवात डीजे वाजविण्यात आला. या नियमपालनाचा आदर्श इतर सण-उत्सवांमध्येही ठेवावा, असे आवाहन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केले.

महोत्सवाला चंद्रपूर शहर व परिसरातील नागरिक, महिला आणि गोविंदा प्रेमींनी मोठी गर्दी केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट व बाळू भाऊ मित्र परिवारच्या सदस्यांनी आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे व सहभागी स्पर्धकांचे आभार अतुल वाघमारे यांनी मानले.

# 'गणरायाची मनोभावे स्थापना'



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपुरातील गडकरी वाड्यावर श्री गणेशाची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.



महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कोराडी, नागपूर येथील निवासस्थानी श्री गणरायाचे मंगलमय आगमन झाले. यावेळी पत्नी ज्योती, मुलगा संकेत, सून अनुष्का, मुलगी पायल, नात काव्या, नातू अदिराज व अविराज तसेच सर्व कुटुंबीयांसमवेत चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री गणरायाची मनोभावे पूजा-अर्चना केली.



सावनेर विधानसभ क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची भक्तिभावाने स्थापना करण्यात आली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचा परिवार रणजीतबाबू देशमुख, रूपाताई देशमुख, डॉ. आयुश्री देशमुख, डॉ. हृदय देशमुख, जिगर देशमुख उपस्थित होते. प्रत्येकाच्या घरात सुखशांती नांदू दे, अशी प्रार्थना त्यांनी श्री गणरायाकडे केली.



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे सचिव तसेच सामाजिक कार्यकर्ते गिरीश पांडव यांच्या धंतोली येथील निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले. यावेळी गिरीश पांडव, अरिशा पांडव, अनिषा पांडव, अर्जुन पांडव यांनी गणरायाचे मनोभावे स्वागत केले.

# शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्नशील : सुधाकर अडबाले

## भंडारा येथे 'उत्कृष्ट शिक्षक सन्मान' सोहळ्यात शिक्षण क्षेत्रातील कर्तृत्ववान शिक्षकांसह ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांचा गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी मी व आमदार ॲड. अभिजीत वंजारी सातत्याने सभागृहात व सभागृहाबाहेत प्रयत्नरत आहोत. पुढे देखील शिक्षकांच्या विविध समस्या व प्रलंबित मागण्यांसाठी सातत्याने प्रयत्न कण्याची ग्वाही विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी दिली. समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान केल्याने त्यांना नवीन ऊर्जा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाउंडेशन तसेच गोविंद मैना फाउंडेशन यांच्या वतीने माजी आमदार स्वर्गीय ना. बा. सपाटे व स्वर्गीय दत्तात्रेय मिर्झापुरे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भंडारा येथे 'सन्मान कर्तृत्वाचा - उत्कृष्ट शिक्षक सन्मान सोहळा २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. हेमंत सेलिब्रेशन, भंडारा येथे रविवारी दुपारी १२ वाजता झालेल्या या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नागपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्था चालक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषणादरम्यान आमदार अडबाले बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले होते. आमदार ॲड. अभिजितजी वंजारी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, सत्कारमूर्ती राजारामजी शुक्ला, होमराज कापगते तसेच शिक्षणाधिकारी (माध्य.) सोनटक्के, गोविंद मैना फाउंडेशनच्या अध्यक्ष सीमा अडबाले, सचिव राहूल अडबाले तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या सोहळ्यात विदर्भ शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष राजाराम शुक्ला, विमाशि संघाचे भंडारा जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष होमराज कापगते यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानंतर नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील उत्कृष्ट शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्था चालक अशा एकूण ११८ सत्कारमूर्तींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. जीवनगौरव पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन विमाशि संघाचे भंडारा जिल्हा कार्यवाह राजेश धुर्वे व नागपूर महानगर कार्यवाह अविनाश बडे यांनी केले. शिक्षकांच्या कर्तृत्वाला समाजासमोर अधोरेखित करणारा हा सोहळा शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विशेष ठरला. उपस्थित ज्येष्ठ मार्गदर्शक व मान्यवरांनी शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना रुजविण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भंडारा जिल्हाध्यक्ष सुधाकर देशमुख, संचालन विमाशि संघ भंडाराचे कोषाध्यक्ष धिरज बांते, सुप्रिया टेंभुर्णे व शमशाद सय्यद मॅडम यांनी, पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या नावांचे वाचन गोंदिया जिल्ह्यासाठी जिल्हाध्यक्ष राजेंद्र झाडे, नागपूर (ग्रा.) साठी जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, नागपूर महानगरसाठी कार्यवाह अविनाश बडे आणि भंडारा जिल्ह्यासाठी धिरज बांते, अनंत जायेभाये यांनी, तर आभारप्रदर्शन पुरुषोत्तम लांजेवार यांनी केले.

### शिक्षक समाजाच्या प्रगतीचा पाया : ॲड. अभिजित वंजारी

उद्घाटनपर भाषणात आमदार ॲड. अभिजित वंजारी यांनी शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व व्यक्त केले. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकवत नाही, तर भावी पिढीच्या विचारांना योग्य दिशा देतो. शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे योगदान समाजाच्या प्रगतीचा पाया आहे, असे त्यांनी सांगितले. शिक्षकांच्या पाठीशी संघटना आणि संस्था खंबीरपणे उभ्या राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# 'ऋषीपंचमी' एक अवलोकन

आज भाद्रपद शुक्ल पंचमी अर्थात ऋषिपंचमी. भारतीय संस्कृतीत ऋषिपंचमी ही तिथी ऋषीं विषयी श्रद्धा,कृतज्ञता,आणि आत्मिक शुद्धीचा संदेश देणारा महत्त्वाचा धार्मिक दिवस आहे.जगातील सर्वश्रेष्ठ असलेल्या भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत ऋषीमुनींचे योगदान अत्यंत महत्तम आहे. निसर्गाला केवळ संसाधन न मानता मानवी जीवनाचे आधार मानण्याची दृष्टी सर्वप्रथम ऋषींनी दिली. वृक्ष,नद्या, पर्वत व अन्य जैवविविधतेचा आदर व पर्यावरणाचे संरक्षण ही जबाबदारी नसून आपले आध्यात्मिक कर्तव्य असल्याचा उदात्त विचार हजारो वर्षांपूर्वी समाजात ऋषींनी दिला. यातून ऋषींचे निसर्गाशी असलेले नाते स्पष्ट होते.

ऋषी केवळ तपस्वीच नव्हेतर ते अज्ञानरुपी अंधःकारात,मोह मायेने गांजलेल्या विश्वात सत्याचा शोध घेऊन ज्ञानदीप उजळून आसमंत प्रकाशित करतात. शारीरिक, मानसिक आणि वैचारिक दुर्बलतेला प्रबळतेत रूपांतर करण्याचे सामर्थ्य ऋषींच्या अंगी आहे.वेद, उपनिषदे, पुराणे, महापुराणे ही ऋषींची ज्ञानदेणगी होय. योग,ध्यान, तत्त्वज्ञान, अध्यात्म,आयुर्वेद,गणित,खगोलशास्त्र,शरीरशास्त्र, भाषाशास्त्र,कृषी अशा विविध क्षेत्रात ऋषींचे योगदान राहिलेले आहे.जगातील सर्वात प्राचीन भारतीय संस्कृतीत,महर्षी कश्यप,अत्री, भारद्वाज, विश्वमित्र,गौतम जमदाग्नी आणि वशिष्ठ या सप्तऋषींचे योगदान फार मोठे व अवर्णनीय आहे.याशिवाय ऋषीपरंपरेत स्त्री ऋषींचेही योगदान राहिले आहे.ज्यामध्ये गार्गी व मैत्रेयी सारख्या विदुषींचा उल्लेख होतो.

प्राचीन ऋषींच्या ज्ञानपरंपरेचे समीक्षा करताना आत्मा,ब्रह्म,कर्म, मोक्ष,पुरुषार्थ, सत्य आणि मानवी जीवनाच्या अथार्चा सखोल विचार ऋषींनी मांडला आहे. शरीर,मन,चित्त यांच्यामधला चित्ताच्या संबंधाचा अभ्यास,तसेच योगसूत्राची परंपरा महर्षी पतंजलि यांच्या योगसूत्राशी जोडली जाते. आर्यभटांचे गणित व खगोल शास्त्रीय कार्य ऋषीपरंपरेत विशेष उल्लेखनीय आहे. सामाजिक आचार विचार, आहार विहार, कर्तव्य,सत्य, अहिंसा,संयम, दान,परोपकार आणि सामाजिक दायीत्वाच्या भावनेचे मार्गदर्शन ऋषी परंपरेत आढळते. ज्ञान केवळ ग्रंथापुरते सिमित न राहता प्रत्यक्ष आचरणातून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचण्याची व्यवस्था ऋषींच्या गुरुशिष्य परंपरेतून चालत आलेली आहे. ज्ञानार्जनासोबत आदर्श चरित्र, अनुशासन आणि नीती मूल्यांवर आधारित शिक्षणासाठी गुरुकुल पद्धती सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावशाली ठरली. धर्माचरणाच्या सात्विक मार्गावर चालत असताना,आदर्श राज्य व्यवस्थेसाठी ऋषींचे मौलिक कामगिरी युगानुयुगे स्मरणात राहणारी आहे.आजची ऋषीपंचमी ही ज्ञानपरंपरचे संजीवक असलेल्या ऋषींचे स्मरण त्यांच्या कार्यप्रति कृतज्ञता आणि आत्मचिंतनाचा दिवस होय.

**- शशिकांत तोटे, दारव्हा,जि.यवतमाळ**
**मो:९१३०८३५४५८**



शब्दवेली
गणेशोत्सव साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
७ दिनांक : मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com Epaper : epaper.sinhvani.com

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव

डॉ.राजेंद्र टेकाडे
काटोल, जि. नागपूर

गणेशोत्सव हा केवळ एक सण नसून आपल्या महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. भाद्रपद महिन्याच्या आगमनाने घराघरांत आणि गल्लीबोळांत चैतन्याची नवी लाट उसळते. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची पायाभरणी करून समाजाला एकत्र आणण्याचे महान कार्य केले.ज्यामुळे हा उत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक बनला. श्रीगणेशाची स्थापना करताना भक्तांच्या मनात अथांग श्रद्धा आणि निस्सीम भक्ती असते. तथापि, काळाच्या ओघात या उत्सवाचे स्वरूप विस्तारत असताना, आपल्या आराध्य देवतेचे पूजन करतानाच निसर्ग देवतेचे संतुलन राखणे हीदेखील आपली महत्त्वाची जबाबदारी ठरते.अध्यात्म आणि विज्ञान या दोन्ही संकल्पना निसर्गाच्या रक्षणाचाच संदेश देतात. त्यामुळे कोणत्याही घटकावर दोषारोपण न करता, अत्यंत आदराने व सामंजस्याने गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित करत 'पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सव' साजरा करणे ही काळाची गरज बनली आहे.

आपल्या प्राचीन गणेशोत्सव परंपरेचा सखोल अभ्यास केल्यास लक्षात येते की, हा उत्सव निसर्गाशी पूर्णपणे सुसंगत असाच साजरा केला जात असे. पूर्वीच्या काळी गावातील स्थानिक कुंभाराकडून मातीची बिनरंगाची अथवा नैसर्गिक घटकांनी साकारलेली छोटीशी गणपतीची मूर्ती आणली जात असे.पाच दिवस घरात बाप्पाची पूजा करून, दुर्वा, कापसाची माळ आणि ताज्या फुलांची पत्री वाहून आरती गायली जात असे. उत्सवानंतर ती मूर्ती तुळशीवृंदावनात किंवा बागेतील झाडाखाली ठेवून त्यावर दैनंदिन पूजेचे शुद्ध पाणी ओतले जाई. काही दिवसांत ती माती पुन्हा निसर्गात आणि मातीत सहज मिसळून जाई. "मातीतून जन्मलेला देह किंवा मूर्ती पुन्हा मातीतच विलीन होते" हे निसर्गचक्राचे वैश्विक सत्य या परंपरेतून स्पष्ट होत असे. निसर्गाच्या या सहज सुंदर नियमाचे पालन करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने निसर्गपूजन होय.

आधुनिक काळात गणेशमूर्ती भव्य आणि देखण्या करण्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरिस आणि विविध चमकदार भडक रासायनिक रंगांचा वापर वाढला आहे. संशोधकांच्या अभ्यासानुसार, अशा भडक रासायनिक रंगांमध्ये तांबे, मॅग्नेशियम, मॅंगनीज, चांदी यांसारख्या मूलद्रव्यांसोबतच शीसे, जस्त, निकेल, कॅडमियम आणि क्रोमियम यांसारखी जड व धोकादायक मूलद्रव्ये समाविष्ट असतात. विसर्जनानंतर जेव्हा या मूर्ती जलस्त्रोतांत मिसळतात, तेव्हा हे रासायनिक घटक पाण्यात विरघळून जलप्रदूषण निर्माण करतात. या दूषित पाण्यामुळे जलचरांच्या जीवनाला धोका निर्माण होतो, तसेच हे पाणी मानवी आरोग्यासाठी विशेषतः त्वचा, डोळे, मुत्रपिंड, हृदय, यकृत आणि मेंदू या अवयवांसाठी हानीकारक ठरू शकते.या समस्येवर अत्यंत सुलभ आणि पर्यावरणपूरक मार्ग म्हणजे शाडूची किंवा साध्या मातीची मूर्ती स्थापन करणे. नैसर्गिक माती पाण्यात अतिशय जलद गतीने विरघळते आणि जलपर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचवत नाही. जर रंग वापरायचेच असतील तर ते नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य असावेत. या सकारात्मक बदलामुळे आपली भक्ती अधिक पवित्र आणि निष्कलंक बनते.

श्रीगणेशाच्या आरास व सजावटीसाठी थर्माकोल आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. थर्माकोल हा अत्यंत स्वस्त आणि वजनाने हलका पर्याय वाटत असला, तरी तो निसर्गात कधीही कुजत नाही. उत्सवानंतर कचऱ्यात फेकलेला थर्माकोल नाल्यांमध्ये आणि गटारांमध्ये साचून सांडपाण्याचा प्रवाह रोखतो, ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. याऐवजी पूर्वीप्रमाणेच पुठ्ठ्यांची, बारदानाची, सुती कपड्यांची, कागदाची किंवा बांबूची सजावट करून आपण एक नयनरम्य आणि कलात्मक आरास उभी करू शकतो. नैसर्गिक साहित्यापासून बनवलेली सजावट ही पर्यावरणस्नेही असते आणि उत्सवानंतर तिचे सहज विघटन होते. अशा कलात्मक प्रयोगांमुळे स्थानिक कारागिरांना रोजगार मिळतो आणि उत्सवातील सौंदर्य अधिक खुलते.

गणेशोत्सवाच्या काळात गणपतीला वाहण्यात येणार्या दुर्वा, फुले, पाने आणि हार या निर्माल्याचे विसर्जन करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अनेकदा निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांसह थेट नदी, तलाव किंवा विहिरींमध्ये टाकले जाते. यामुळे वाहते पाणी दूषित होते आणि कुजणाऱ्या वनस्पतींमुळे पाण्याला दुर्गंधी येऊन साथीच्या रोगांचा प्रसार होऊ शकतो.शास्त्रोक्त आणि धार्मिक दृष्टिकोनातून निर्माल्याचा पायदळी तुडवला जाण्यापासून बचाव करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच जलस्त्रोत स्वच्छ ठेवणेही गरजेचे आहे. निर्माल्याचे नदीत विसर्जन करण्याऐवजी प्रत्येक गणेश मंडळाने व घराघरांनी निर्माल्याचे योग्य संकलन करून त्यापासून 'गांडूळ खत' किंवा सेंद्रिय खत तयार करावे. हे खत झाडांसाठी आणि शेतीसाठी उत्तम पोषक घटक ठरते. तसेच, ताजी पाने-फुले गुरांना खाद्य म्हणून दिल्यास गोरक्षणाचा आणि पुण्यकमार्चा आनंदही मिळतो.



उत्सवातील उत्साह आणि आनंद व्यक्त करताना ध्वनीचे प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेणे हे सुजाण नागरिकत्वाचे लक्षण आहे. सार्वजनिक उत्सवात वापरल्या जाणाऱ्या अतिउच्च क्षमतेच्या ध्वनिक्षेपकांमुळे ८० ते ९० डेसिबलांपेक्षा जास्त आवाज निर्माण होतो. रात्रीच्या वेळी किंवा मर्यादेपेक्षा जास्त आवाजामुळे लहान मुले, अभ्यास करणारे विद्यार्थी, वयोवृद्ध, हृदयरोगी व आजारी व्यक्तींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.कानाचे पडदे बाधित होणे, चिडचिड वाढणे किंवा दचकून उठणे असे त्रास उद्भवू शकतात. सर्वोच्च न्यायालयाच्या नियमावलीनुसार आवाजाची तीव्रता मर्यादित ठेवून, रात्री १० नंतर ध्वनिक्षेपकांचा मर्यादित वापर करणे हे सर्वांच्याच हिताचे आहे.आवाजाच्या गोंधळापेक्षा पारंपरिक वाद्ये, भजन, कीर्तन आणि मृदु संगीताच्या साथीने उत्सव साजरा केल्यास परिसरातील वातावरण खऱ्या अर्थाने मंगलमय व शांततापूर्ण बनते.

गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये गुलालाची मुक्त उधळण केली जाते. रासायनिक रांगोळीच्या गुलालात खरखरीत कण असतात, ज्यामुळे डोळ्यांचे आणि श्वसनसंस्थेचे विकार उद्भवू शकतात. याऐवजी पिठापासून बनवलेला मऊ नैसर्गिक गुलाल, हळद-कुंकू किंवा अष्टगंधाचा मर्यादित वापर करणे आरोग्यासाठी सुरक्षित ठरते. त्याचप्रमाणे उत्सवाच्या काळात अनावश्यक वीज वापर किंवा तेला-तुपाचा अपव्यय टाळणे हीदेखील काळाची गरज आहे. दिवसा दिव्यांच्या माळा बंद ठेवून विजेची बचत करावी. तसेच, समई-निरंजनांमध्ये आवश्यक तेवढेच तेल वापरून, उर्वरित संपत्ती किंवा संसाधने समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या मदतीसाठी वापरल्यास देवाची खरी सेवा होईल. फटाक्यांच्या धुरात पैशांची आणि पर्यावरणाची हानी करण्याऐवजी तो निधी पूरग्रस्त, भूकंपग्रस्त बांधवांना मदत करण्यासाठी किंवा आरोग्य शिबिरे, शिक्षण आणि वृक्षारोपण यांसारख्या सामाजिक उपक्रमांसाठी वापरला पाहिजे.

गणेशोत्सव हा आपल्या संस्कृतीचा गौरवशाली वारसा आहे. या उत्सवाचे पवित्र्य आणि आनंदाचा गाभा कायम राखून पर्यावरणाचे रक्षण करणे ही आजच्या भावी पिढीची नैतिक जबाबदारी आहे. कोणत्याही परंपरेला धक्का न लावता, केवळ सुजाण आणि विवेकवादी दृष्टिकोन स्वीकारल्यास आपण हा उत्सव अधिक सुंदर बनवू शकतो. चला तर मग, यंदाच्या गणेशोत्सवात मातीची मूर्ती, नैसर्गिक रंग, कागदी-कापडी आरास, निर्माल्याचे खतात रूपांतर, मर्यादित आवाज आणि सामाजिक भान जपून एका नव्या पर्वाची सुरुवात करूया. निसर्ग संवर्धनाचा हा संदेश घरोघरी पोहोचवून 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' साजरा करणे हाच श्रीगणेशाच्या चरणी खरा भक्तीपुष्प ठरेल.

- ९१४५७७९०५०

# "गणेश चतुर्थी" तयारी आणि भक्तिमय वातावरण

आपल्या भारतीय संस्कृतीतील एक भक्तिमय सोहळा म्हणजे गणेश चतुर्थी. गणेश चतुर्थी म्हटलं कि, भक्तांच्या भक्तीचा सोहळा पूजे-अर्चेचा मेळा. लाडक्या बाप्पाचं आगमन म्हटलं कि तयारीला उधाण येतं. मार्केट सुंदर सुंदर गणेश मूर्तिन्नी सजलेलं असतं. कामाची, प्रसादाची, फुलमाळांची, सजावटीची जणू रेलचेल असते. चिमुकल्यांपासून अगदी मोठ्यांपर्यंत प्रत्येक जण बाप्पाच्या आगमनाच्या तयारीत असतो. कधी एकदा बाप्पाला घरी आणतो असं होतं. मोठ्यांपासून अगदी लहानग्या चिमुकल्या पर्यंत सर्वजण आनंदाने, हर्षाने तयारीला लागलेले असतात.

गणेश चतुर्थीची शाळेला सुट्टी जाहीर होण्याआधीच मुलं स्वतःच सुट्टी जाहीर करतात. काय तो आनंद, काय तो भक्तीरस सगळं कांही मन भावनारं असतं.

चिमुकली लहानगी मुलं स्वतः च्या इवल्याशा हातांनी बाप्पासाठी मुकुट, लोलक, तिलक, मोती माळा, बाजूबंद, सुंदर वस्त्रे खरेदी करतात. बाप्पाची सुंदर सजावट करतात. लहान लेकरांचा आनंद द्विगुणित झालेला असतो. शाळेतून कधी एकदा घरी जातो असं होतं. ही बाप्पाची ओढ. आजी आजोबा, आई बाबा, ताई, दादा आलेले पाहुणे राऊळे घरातील सर्वजण सकाळ संध्याकाळ मनोभावे बाप्पाची आरती करतात.

गुळाचे मोदक, तांदूळाचे उकडीचे मोदक, पेढ्याचे मोदक, गूळ, तीळ, शेंगदाण्याचे मोदक, गव्हाच्या पिठाचे मोदक, मोतीचूर लाडू, पाच फळे प्रसादाने भरलेलं ताट, आंबा व केळीच्या पानांनी सजवलेलं देवघर, सुंदरशा रांगोळ्या. सकाळच्या राम प्रहरापासून रात्री झोप लागेपर्यंत घरात वाजत असलेली लाडक्या बाप्पाची गाणी, भक्तीगीते ऐकून मन प्रसन्न होतं. आपण बाप्पाची भक्तीगीते ऐकत, बाप्पाच्या भक्तीत तल्लीन झालेलो असतो. बाप्पाची गाणी ऐकत घरातील कामं अगदी चुटकीसरशी होतात.

संध्याकाळी गल्लीबोळातील सर्वजण थाटामाटात बाप्पाला घेऊन येतात. तो ढोल-ताशांचा, टाळ, मृदूंग, बॅंड, तऱ्हेतऱ्हेची भक्तीगीते, भक्तांच्या मुखी गणरायाची गाणी. बाप्पाच्या भक्तीगीतांनी सारा आसमंत दुमदुमलेला असतो, भक्ती गीतांमध्ये तल्लीन झालेली भक्तगण मंडळी बेभान होऊन नाचतात, गातात अन त्या आनंदात बाप्पाचं मनोभावे स्वागत करतात. गणरायांच्या आगमनाने वातावरण निर्मळ झालेलं असतं. सर्वजण मनातील द्वेष, मत्सर, दुजाभाव बाजूला सारून लाडक्या गणरायाचं, लाडक्या बाप्पाचं मिळून स्वागत करतात.

सर्वांना गणेश चतुर्थीच्या आनंदमय शुभेच्छा...!

**- सौ. मनीषा सोन्नेकर / सोनकांबळे**
देगलूर. जि. नांदेड
मो.९९६००२८८९९

## गणपती बाप्पाचे आगमन

आला आला गणराया,
घेऊन सुख-शांतीची माया;
मंगलमूर्ती मोरया म्हणता,
आनंद फुलला अंगणात सारा!

ढोल-ताशांचा नाद दुमदुमला,
भक्तीचा दरवळ चहू दिशेला;
बाप्पाच्या चरणी माथा टेकता,
दुःखाचा अंधार दूर पळाला!

मोदकाचा गोड सुगंध दरवळला,
गणरायाच्या नामाने जीव भारावला;
विघ्नहर्त्याच्या कृपेने आज,
प्रत्येक मनात आशेचा दीप उजळला!

बाप्पा ये रे लवकर घरी,
कृपेची ठेव छाया डोईवरी;
सुख-समृद्धी नांदो सर्वांच्या दारी,
गणपती बाप्पा मोरया!
जयघोष होवो घरोघरी!

**- सौ. माधुरी धनोकार**



## गणपती गर्दी

पाऊल जपून खड्डे रस्ते
गणपती बघायला जावं कसं
मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेती
बाहेर पडणं मुश्किलच होईल

टाळ कसे वाजवून आता
बाप्पा मोरया म्हणू आता
तबकात गणेश मूर्ती ठेवून
रस्त्यावर गर्दी होई तुफान

घरची मंडळी वाट बघातात
पाहुणा गणेश स्वागत करता
बस, रिक्षा कार रस्त्यावर ही
गणेश स्वागत रांगोळी काढूनी

प्रत्येक आनंद बाप्पा येणार
स्वागत प्रदुषण धुराळ्यात,
मास्क नाकाला रुमाल बांधून
गणपती बाप्पा चेहरा झाकुन

आजुबाजूचे लोक मोरया म्हणे
गणेश पाहून आनंद झाला होई
तोरण दरवाजा लावून सुरेखहे
सुस्वागतम आगमनाच्या वेळी

**- सौ. मंगल सुधीर आपटे, पुणे**

## बाप्पा

तव आगमने पुलकित झाले
तन मन घर गावं नगर शहर
आज सर्व मुखी होतो आहे
बाप्पा तव नामाचाच गजर

पाहता तव रूप मनोहर
सुख पावले रे मम अंतर
मागणे हेच तुजला बाप्पा
पडो ना तुजपासुन अंतर

तूच गजानन, तूच मयुरेश्वर
चिंतामणी तू ,तूच विघ्नेश्वर
हे गणनायका तूच आम्हास
आहे सर्व सुखांचे रे आगर

तव आगमनाने बाप्पा आज
हरखले आनंदाने अवघे घर
लाभू दे मंगल सहवास तुझा
असु दे कृपा तुझी आम्हावर

**- गणेश पांडे, नागपूर**
९५०३३५०५७४



# दहा दिवसांचा पाहुणा नव्हे, दहा दिवसांची साधना!

मनिष शिंगणे
उमरेड

वर्षातून एकदा गणपतीबाप्पा आपल्या घरी येतात. आपण त्यांचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करतो. घर सजवतो, आरास करतो, मोदक करतो, पूजा-अर्चा करतो, पण या दहा दिवसांचा खरा अर्थ आपण कधी मनापासून समजून घेतला आहे का? गणपतीबाप्पा म्हणजे केवळ उत्सव नाही, तर आत्मचिंतनाची संधी आहे. हे दहा दिवस बाप्पा आपल्या घरी मुक्कामी येतात, असे आपण म्हणतो. पण खरं पाहता ते आपल्या घरात येण्यापेक्षा आपल्या मनात येण्यासाठी येतात. आपल्या मनातील अहंकार, राग, द्वेष, मत्सर, असूया आणि नकारात्मक विचार दूर करून विवेक, संयम, प्रेम, श्रद्धा आणि सद्बुद्धी निर्माण करण्याचा संदेश ते देतात. म्हणून या दहा दिवसांत केवळ ढोल-ताशे, सजावट, रोषणाई आणि दिखावा न करता बाप्पांच्या विचारांचे वाचन करा, मंत्रजप करा, आराधना करा, धार्मिक ग्रंथांचे चिंतन करा आणि काही वेळ स्वतःच्या मनाशी संवाद साधा.



दररोज काही मिनिटे शांतपणे बाप्पांसमोर बसा. गणपती बाप्पा, माझ्या घरात सुख-समृद्धी दे, एवढीच मागणी करण्याऐवजी 'बाप्पा, मला योग्य मार्गावर चालण्याची बुद्धी दे, संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य दे आणि दुसऱ्याच्या दुःखात उभे राहण्याचे सामर्थ्य दे,' अशी प्रार्थना करूया.

गणपतीचे मोठे मस्तक आपल्याला मोठा विचार करण्याची, मोठे कान सगळ्यांचे ऐकून घेण्याची, लहान डोळे एकाग्रतेची, तर सोंड परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याची शिकवण देतात. त्यांच्या हातातील विविध आयुधे आणि प्रतीके जीवनातील वेगवेगळ्या मूल्यांची आठवण करून देतात. म्हणूनच बाप्पांचे दहा दिवस म्हणजे दहा दिवसांची भक्ती, दहा दिवसांचे चिंतन आणि दहा दिवसांचा संस्कार असायला हवा.

उत्सव साजरा करा, आनंद साजरा करा; पण कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घ्या. मोठ्या आवाजापेक्षा मनातील नामस्मरणाचा आवाज मोठा असू द्या. दिखाव्यापेक्षा श्रद्धा मोठी असू द्या. स्पर्धेपेक्षा भक्ती मोठी असू द्या.

बाप्पा दहा दिवसांनी निरोप घेतात. मूर्ती विसर्जित होते; पण बाप्पांनी दिलेला विचार विसर्जित होऊ नये. दहा दिवस बाप्पांची आराधना करून अकराव्या दिवशी पुन्हा जुन्या सवयींकडे वळण्यापेक्षा, त्या दहा दिवसांत शिकलेला एखादा चांगला विचार आयुष्यभर जपण्याचा संकल्प करूया. गणपतीबाप्पा आपल्या घरी येतात ते दहा दिवसांसाठी; पण त्यांचे संस्कार आपल्या मनात आयुष्यभर राहावेत, हीच खरी गणेशभक्ती! चला, यंदाचा गणेशोत्सव केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर स्वतःला घडविण्याचा, मन शुद्ध करण्याचा आणि सद्विचारांची सुरुवात करण्याचा उत्सव बनवूया.

**गणपती बाप्पा मोरया!**
**मंगलमूर्ती मोरया!**

# महाराष्ट्रासह देशात बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी !

रमेश लांजेवार
नागपूर

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धमार्तील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते. याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते. रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.

श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते. गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात. गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते. देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे. कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले. हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.

भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते. श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर, भालचंद्र, गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते.

त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो. भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते. प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात. परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव. गणेशमुर्तीची स्थापना करून



गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो. या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते. यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.

लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही. गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी "गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या"घोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो. इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला. त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.

यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा-अर्चना केली जाते. पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा, बेल-फुल, शम्मीपत्र,शेंदूर यांचा मुख्यत्वे करून वापर होतो. भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी नामांकित मंदिरे आहेत. त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते. मानवजातीला देवी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा-महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल. गणपती बाप्पा मोरया !

- ९९२१६९०७७९

# श्रीगणेश चतुर्थी : गणपती बाप्पाचा जन्मोत्सव

श्रीकृष्णदास निरंकारी
गडचिरोली

भारतात सार्वजनिक गणेशोत्सव हे भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सन १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

श्रीगणेश चतुर्थी हा हिंदूंचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा सण आहे. गणेश चतुर्थी म्हणजे काय? हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थीला साजरा केला जातो. हा गणपती बाप्पाचा जन्मोत्सव मानला जातो. गणपती हा बुद्धी, समृद्धी आणि विघ्नहर्ता- संकटे दूर करणारा) मानला जातो. प्राणप्रतिष्ठा आणि पूजन विधीया दिवशी घरात किंवा सार्वजनिक मंडळात गणेशाच्या मातीच्या (पार्थिव) मूर्तीची स्थापना केली जाते. षोडशोपचारांनी (सोळा उपचारांनी) बाप्पाची पूजा केली जाते. पूजेत बाप्पाला २१ पत्री (विविध प्रकारची पाने), दुर्वा, फुले आणि मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे लोकमान्य टिळकांनी आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांनी या सणाला सार्वजनिक स्वरूप दिले, जेणेकरून लोक एकत्र येऊ शकतील. हा सण एकता, भक्ती आणि संस्कृतीचा संदेश देतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे. तुम्हाला गणेशोत्सवाविषयी आणखी काय जाणून घ्यायला आवडेल? जसे की:पूजेचा विधी आणि साहित्य गणेशोत्सवाचा इतिहास नैवेद्य आणि मोदक, आदीबद्दल मी अधिक माहिती देत आहे.

चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीची आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्रे... श्रीगणेश चतुर्थी फक्त सण साजरा करण्याचा नाही, तर त्यामागचा सामाजिक दृष्टीकोनही महत्त्वाचा आहे. गणेश चतुर्थी हा सण भक्तीचा, संस्कृतीचा, आणि एकतेचा सण आहे. गणपती बाप्पा.. काही वर्षी हरतालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी, यापूर्वी सन २०००, २००६ आणि २००९ मध्ये हरतालिका आणि श्री गणेश चतुर्थी एकाच दिवशी आले होते. यानंतर सन २०३२ मध्येही असाच योग येणार आहे असे पंचांग कर्ते खगोल अभ्यासक सांगतात. श्री गणेश चतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे.

श्री गणेश चतुर्थी हे भाद्रपद शुक्ल चतुर्थीर्ला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी श्रीगणेशजींचा जन्म. गणेश पुराण कथासार- गणेश पुराण या संस्कृत ग्रंथातील कथांचा मराठीतील सारांश किंवा कथांचे संकलन होय, ज्यात गणेशाचे अवतार, लीला, विविध कथा आणि तत्त्वज्ञान यांनी परिपूर्ण आहे...

श्रीगणेश चतुर्थी हे भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीर्ला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धी विनायकी चतुर्थी किंवा "शिवा" असेही म्हटले जाते. या चतुर्थीर्ला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. स्त्रीमनाचे लोकदैवत असेही श्री गणेशाला मानतात. श्रीगणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची



प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. गोव्यातील गाणपत्य संप्रदायाचे हे एक व्रत आहे. श्रावण शुक्ल चतुर्थी ते भाद्रपद शुक्ल चतुर्थी असे महिनाभर करायचे हे व्रत आहे. नदीकिनारी जाऊन, स्नान करून आपल्या हाताच्या अंगठ्याएवढी मातीची गणेशमूर्ती हातावरच तयार करतात. तिचे सोळा उपचारांनी पूजन करून ती एका नदीतच विसर्जन करतात, असे हे व्रत आहे. याला "पार्थिव गणेश व्रत" म्हणतात. महिनाभर जमले नाही तर किमान शेवटच्या दिवशी तरी पार्थिव मूर्तीची पूजा करावी अशी यामागे धारणा आहे.

**गणेशोत्सवः** प्रतिष्ठापना पूजा- घरगुती गणेश स्थापना- गणेश चतुथीर्ला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्री, नैवेद्य इ.सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध २१ पत्री अर्पण केल्या जातात. पावसाळ्यात या सर्व पत्री सामान्यतः उपलब्ध असतात आणि त्या प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्मही आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तरपूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी पुढील मंत्र म्हणतात. " यान्तु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् इष्टकामप्रसिद्धयर्थं पुनरागमनाय च" श्री महागणपतिपूजन केलेल्या नारळावर तसेच उमामहेश्वर आणि श्री सिद्धिविनायक यांच्यावर अक्षता वाहून मूर्ती स्थानापासून थोडी हलवतात. त्यानंतर जलाशयात तिचे विसर्जन करतात. काळाच्या ओघात हे व्रत कुटुंबाच्या पद्धतीनुसार दीड, पाच, सात, दहा दिवस केले जाते. काही कुटुंबात २१ दिवस हे व्रत करतात, तर काही ठिकाणी हे व्रत वार्षिक स्वरूपाचे असते. या दिवशी किंवा घरात गणपती असेपर्यंत अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण केले जाते.

काही ठिकाणी गणेशगीता या ग्रंथाचे वाचनही केले जाते. गणपती ही संघटनेची देवता आहे. ऋग्वेदात ब्राह्मणस्पती देवतेची स्तुती केलेली आहे. तो सर्व गणांचा अधिपती आहे असे त्यात म्हटले आहे. या देवतेचा विकास होऊन पुराणकाळात तिला गणपती हे रूप प्राप्त झाले, असे मानले जाते. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा होत असतो. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणानुसार सन २०२५ साली गणेशोत्सवाला "राज्योत्सव" अशी मान्यता जाहीर करण्यात आली आहे.

- ९४२३३७१४८३

# आधी वंदु तूज मोरया..

शशिकांत तोटे
जि. यवतमाळ

गणपती बाप्पा मोरया.. मंगलमूर्ती मोरया..! अशा जयघोषात हर्षोउल्हासात विघ्नहर्ता वरदविनायकाचे आगमन लवकरच होत आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थी पासून भाद्रपद अनंत चतुर्दशी पर्यंत श्रीगणरायाचा उत्सव चालतो. महाराष्ट्रात गणेश उत्सवाला सांस्कृतिकदृष्ट्या अनन्य साधारण महत्त्व आहे. धार्मिक परंपरा, भक्तीभावाची अतूट जोड आहे. शुभकार्य वा मंगल प्रसंगाची सुरुवात श्रीगणेशाच्या पदस्पर्शाने व स्तवनाने होते.

श्रीगणेश आरंभदेवता आहे. ती वेदांचीही आद्यदेवता आहे. वेदांनीही प्रतिपादलेली आहे, आत्मस्वरूपात रमलेली बुद्धी ही गणेश आहे. कैवल्य साम्राज्यमूर्ति माऊली महावैष्णव ज्ञानेश्वरीच्या पहिल्या ओवीत

'ओम नमोजी आद्या'
वेद प्रतिपाद्या '
जय जय स्वसंविद्या
आत्मरूपा'
देवा तूची गणेशु'
सकलमती प्रकाशु '
म्हणे निवृत्ती दासु अवधारी
जो जी ' अशा शब्दांत

माऊलींनी आरंभ देवता श्री गणेशाचे फार सुंदर वर्णन केलेले आहे.

ज्याप्रमाणे माऊलींनी ओमकार हाच परमात्मा आहे, असे कल्पुन ज्ञानेश्वरी ग्रंथाचा प्रारंभ केला. अगदी त्याचप्रमाणे शांतीब्रह्म संत एकनाथांनी सुद्धा पुढील शब्दरचनेद्वारे गजवंदन करून भावार्थ रामायण ग्रंथ लिखाणास प्रारंभ केला.

'वेदवेदांतवेद्या'
वंद्यही परमवंद्या '
स्वसंवेद्या श्री गणेशा''
तुझे निर्धारता रूप'
केवळ स्वरूपाचे स्वरूप'
तेथे अवयव कल्पिता अमुप'
तवं कल्पनेचा
लोप स्वरूपी तुझ्या '
या लागी जैसा अससी
तैसियासी'
नमन साकार निराकारासी क
तवं अंगत्व मुकले अंगासी
'भज्य भजकांसी ' अद्वैत ''

संत एकनाथांनी भावार्थ रामायणाचा प्रारंभ वरील गणेश वंदनाने केला.त्या ओवींचा भावार्थ लक्षात घेतला पाहिजे. अनादी अनंता वेदवेदांनाही परमवंदनीय असलेल्या आणि जो केवळ स्वतःच जाणू शकतो. अशा श्रीगणेशाला संत एकनाथ रचनेतून वंदन करतात.'तू' म्हणजे अरुपाचे रूप आहेस. तुझे अवयव कल्पना करावी तेवढी आहेत. शेवटी कल्पनेचाच लोप होतो.त्यामुळे 'तू' जसा असशील साकार वा निराकार रूपात असशील तसा तुला नमन असो. तुझ्या भक्तीने भक्त आणि तुझ्यातलं द्वैतच संपून जातं. वारकरी संप्रदायाच्या नियमानुसार, कीर्तनाचा आरंभ सुद्धा 'नमिला गणपती माऊली, माऊली शारदा' या संत तुकारामांच्या अभंगरचनेने होत असतो.

श्रीगणेशाचे कायारंभी स्तवन हा ग्रंथकाराचा संत वाङःमयाचा महत्त्वाचा भाग राहिलेला आहे. संत तुकारामांनी रचलेल्या गाथेतील पुढील अभंगातून श्रीगणेशाच्या ओमकार रूपाचे वर्णन वेदवाणीच्या प्रमाणाने दिले आहे.

'ओमकार प्रधान रूप
गणेशाचे'
हे तिन्ही देवांचे जन्मस्थान''
अकार तो ब्रह्म उकार
तो विष्णू '
मकार महेश्वर जाणियेला ''
ऐसे तिन्ही देव जेथोनि उत्पन्न '
तो हा गजानन मायबाप ''
तुका म्हणे ऐसी आहे वेदवाणी '
पहावी पुराणी व्यासाचीया ''''

सृष्टी उत्पत्तीच्या वेळी जो नादमंत्र झाला तो ओमकार आहे. अकार,उकार, मकार या तिन्ही मात्रांनी ओमकार सिद्ध होतो. यातील अकार विश्वनिर्मितीचे अधिकारी ब्रह्मदेव, श्रीहरी सृष्टीचे पालनकर्ते भगवान श्रीशंकर म्हणजे उदर होय. ब्रम्हा,विष्णू, महेश हे तिन्ही देव हे मूळ गणेश तत्वांपासून निर्माण झाले आहे. तुकाराम महाराज म्हणतात.

हे जर खोटे वाटत असेल तर, व्यासांच्या पुराणांना विचारावे.



श्रीगणेश आद्य व आरंभदेवता कशी आहे. हे संत साहित्यात उमगल्याशिवाय राहत नाही.

समर्थ रामदास स्वामींनी सुद्धा दासबोध ग्रंथाच्या पहिल्या दशकात दुसऱ्या समासात श्री गणेशाचे स्तवन केले आहे. त्यामध्ये समर्थ गणेश स्तवन करताना म्हणतात...

'ओम नमोजी गणनायका '
सर्व सिद्धी फलदायका '
अज्ञानभ्रांती छेदता बोधरुपा ''''

अशा एकंदरीत श्री गणेश स्तवनाच्या तीस ओव्या आहेत. संत आणि सत्पुरुषांनी केलेल्या व्याख्यानावरून आणि वर्णनावरून श्रीगणेशाचे आद्यत्व निराकत्व, निगुर्णातत्व आणि त्या मागचा आध्यात्मिक अर्थ स्पष्ट होतो.समर्थ रामदासांनी श्री गणेशाची आरती रचलेली आहे.ती सर्वश्रुत सातासमुद्रापलीकडे ही आज श्रीगणेश भक्त मोठ्या प्रेमाने गातात. त्याचा भावार्थ फार सुंदर आहे.

'दासरामाचा वाट पाहे सदना '
संकटी पावावे कनिवार्णी रक्षावे
' सुरवर वंदना ' जय देव जय
देव जय मंगलमूर्ती ' दर्शन मात्रे
कामनापूर्ती '''

इथे त्यातला भाव असा आहे की, तू आमच्या घरी येऊन कधी स्थापन होशील. तुझी स्थापना करून मागणे मागायचे आहे. तुझी उपासना करून तू आम्हाला संकटातून सोडवशील. कारण आदी, अंती, मध्य तूच तू आहे.

कारण तूच पालनकर्ता, तारणहर्ता, बुद्धीदाता विघ्नविनाशाय, साधकांचा चिंतामणी आहेस. वारंवार तुला नमन.

जय गणेश.. जय गणेश. !

- ९१३०८३५४५८